१९३७-२०२६ वर्ष ९० वे

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | मंगळवार | दि. २७ ऑक्टोबर २०२६ | अंक १४१ | पृष्ठे ८ | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

खारपाडा टोल नाक्यावर हाणामारी

पनवेल : मुंबई-गोवा महामार्गावर खारपाडा येथे असलेल्या टोलनाक्यावर रविवारी (दि.२५) रात्री प्रवासी आणि टोल कर्मचारी यांच्यात तुंबळ हाणामारी झाली. या घटनेची व्हिडिओ समाज माध्यमांवर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. याप्रकरणी कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही. मात्र, या व्हिडिओमध्ये लाठ्या-काठ्यांचा वापर झाल्याचे पाहायला मिळत आहे. खारपाडा टोल नाका येथे रविवारी रात्रीच्या सुमारास बसमधील प्रवासी आणि टोल नाक्यावरील कर्मचाऱ्यांमध्ये टोल भरण्यावरून वाद झाला. या वादाचे रूपांतर फ्रीस्टाइल हाणामारीत झाले. पनवेल तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणत आणली आणि पुढील •➤पान २ वर

वरदविनायक मंदिर तीन महिने बंद

पनवेल : अष्टविनायक तीर्थक्षेत्रांच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी एक अत्यंत महत्त्वाची बातमी आहे. रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील महड येथील प्रसिद्ध श्री वरदविनायक गणपती मंदिर दि.२५ ऑक्टोबर पासून पुढील ३ महिन्यांसाठी भाविकांना दर्शनासाठी पूर्णपणे बंद राहणार आहे. मंदिराच्या भव्य पुनर्विकास आणि जीर्णोद्धाराच्या कामामुळे हा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य शासनाच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत महड येथील मंदिराच्या पुनर्विकासाच्या कामाचे •➤पान २ वर



वेधक

रुळ ओलांडताना ट्रेनची धडक

मुंबई : मध्य रेल्वेच्या मुंबई लोकल मार्गावर सोमवारी सकाळपासूनच रेल्वेचा खोळंबा झाल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. ठाणे ते सीएसएमटी मार्गादरम्यान रेल्वेसेवा विस्कीळीत झाल्याने लोकल सेवा तब्बल ४ तासांहून अधिक काळ बंद होती. यावेळी, अनेक प्रवाशांनी लोकल रेल्वे थांबलेल्या ठिकाणीच सोडून ट्रॅकवरुन मार्ग काढत पुढे जाण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, भांडुप स्थानकातील रेल्वे ट्रॅकवर भीषण दुर्घटना घडली असून, एका प्रवाशाचा लोकलच्या धडकेत मृत्यू झाला आहे. २१ वर्षीय साहिल थिटे या तरुणाचा मृत्यू झाला असून, तो ४ नंबर प्लेटफॉर्मवरून ३ नंबर प्लेटफॉर्मवरील लोकल पकडण्यासाठी जात असताना त्याला लोकलची धडक बसली.

ऑडियो क्लिप प्रकरणी एसआयटीची स्थापना

मुंबई : मनोज जरांगे पाटील यांनी समोर आणलेल्या ५०० कोटी रुपयांच्या कथित ऑडिओ क्लिपप्रकरणी अत्यंत मोठी माहिती समोर आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी मुंबई पोलीस आयुक्तांना विशेष तपास पथक स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानंतर अप्पर पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे यांच्या अध्यक्षतेखाली त्रिस्तरीय एसआयटीची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. एसआयटीच्या स्थापनेनंतर मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा राज्य सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. ''फक्त एसआयटी गठीत करून •➤पान २ वर

बाळाला थेट स्कायवॉकवरुन फेकलं

मुंबई : घाटकोपर रेल्वे स्थानक परिसरात धक्कादायक घटना घडली आहे. पत्नीशी झालेल्या वादानंतर एका पित्याने आपल्या अवघ्या नऊ महिन्यांच्या बाळाला स्कायवॉकवरून खाली फेकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रविवारी (दि.२५) रात्री १० वाजताच्या सुमारास ही घटना घडली. या घटनेत बाळ गंभीर जखमी झाले असून, त्याच्यावर शीव रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी घाटकोपर पोलिसांनी महिलेच्या तक्रारीवरून आरोपी पतीविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. या प्रकरणातील •➤पान २ वर

20,000 विद्यार्थी धोक्यात

प्रमोद जाधव
। रायगड ।

रायगड जिल्हा परिषद शाळांच्या दुरुस्तीसाठी विविध योजनांतून तब्बल ३६ कोटी ४८ लाख रुपयांचा निधी उपलब्ध असतानाही जिल्ह्यातील १ हजार ९३८ शाळांच्या इमारतींची दुरुस्ती रखडल्याचे समोर आले आहे. त्यातच २३५ इमारती अतिधोकादायक असल्याची बाब उघड झाली आहे. दोन दिवसांपूर्वी धाकटे शहापूर येथील शाळेच्या वर्गखोलीचा स्लॅब कोसळल्याने एका विद्यार्थीनीला गंभीर दुखापत झाली होती. निधी असतानाही दुरुस्ती न झाल्याने ही घटना घडल्याचा आरोप नागरिकांनी केला असून, शाळांच्या इमारतींची दुरवस्था आणि उपलब्ध निधीचा विनियोग याबाबत जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

रायगड जिल्हा परिषदेमार्फत पहिली ते आठवीपर्यंतच्या २ हजार ४५८ शाळा चालविल्या जातात. या शाळांमध्ये सुमारे ८० हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून, पाच हजार शिक्षक अध्यापनाचे काम करतात. जिल्ह्यातील शाळांच्या एकूण ४ हजार ३९४ इमारतींमध्ये ७ हजार ९९४ वर्गखोल्या आहेत. मात्र, या शाळांमधील पायाभूत सुविधांची स्थिती पाहता विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरणात शिक्षण मिळत आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात असले, तरी शाळांच्या इमारतींच्या देखभाल-दुरुस्तीकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याचे चित्र आहे. अनेक ठिकाणी खिडक्या, दरवाजे खराब झाले आहेत, भिंतींना तडे गेले आहेत, तर काही इमारतींच्या स्लॅबची अवस्था चिंताजनक आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी वर्गखोल्यांमध्ये बसून शिक्षण घ्यायचे तरी कसे, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

धाकटे शहापूर येथील शाळेत सुमारे १५ वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या दोन वर्गखोल्यांचा स्लॅब कोसळल्याची घटना घडली. या बांधकामासाठी सुमारे १० लाख रुपये खर्च झाल्याचा अंदाज शिक्षण विभागाकडून व्यक्त करण्यात आल्याचे सांगितले जाते. या घटनेनंतर शाळांच्या बांधकामाचा दर्जा, देखभाल आणि नियमित तपासणी याबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत.

जिल्ह्यातील १ हजार ९३८ इमारतींची दुरुस्ती अद्याप प्रलंबित असल्याने या इमारतींमध्ये शिक्षण घेणाऱ्या अंदाजे २० हजार विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का, असा संतप्त सवाल पालकांकडून केला जात आहे. शाळांच्या इमारती आणि वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी विविध स्रोतांतून निधी •➤पान २ वर



पालकमंत्री, आमदारांचे दुर्लक्ष

पालकमंत्र्यांच्या तालुक्यातील ३२, तर आमदार महेंद्र थोरवे यांच्या कर्जत तालुक्यातील ३४ शाळांच्या इमारती अतिधोकादायक असल्याची आकडेवारी आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शाळांच्या पायाभूत सुविधांचा प्रश्न केवळ ग्रामीण भागापुरता मर्यादित नसून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी संबंधित गंभीर विषय बनला आहे.

शाळांच्या इमारतीवर दृष्टीक्षेप

इमारतींची सद्यस्थिती	संख्या
उत्तम इमारत	2221
किरकोळ दुरुस्ती	986
मोठी दुरुस्ती	952
नव्याने बांधकाम करणे	235
एकूण	4394

निधी गेला कुठे?

शाळांची दुरुस्ती ही केवळ प्रशासकीय कामाची बाब नाही, तर हजारो विद्यार्थ्यांच्या जीविताशी निगडित जबाबदारी आहे. त्यामुळे धोकादायक इमारतींचे तातडीने संरचनात्मक परीक्षण, आवश्यक दुरुस्ती आणि पुनर्बांधणी, तसेच उपलब्ध निधीच्या वापराचा पारदर्शक तपशील जाहीर करण्याची मागणी जोर धरत आहे. जिल्हा परिषद प्रशासन आणि शिक्षण विभाग या प्रश्नावर कोणती ठोस भूमिका घेणार, याकडे पालक, शिक्षक आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

36 कोटींचा निधी, तरी शाळांच्या इमारतींची दुर्दशा

1,938 इमारतींची दुरुस्ती रखडली

235 इमारती अतिधोकादायक

अतिधोकादायक इमारतींवर दृष्टीक्षेप

तालुके	इमारत संख्या
अलिबाग	10
कर्जत	34
खालापूर	9
महाड	32
माणगाव	12
म्हसळा	16
मुरूड	6
पनवेल	18
पेण	20
पोलादपूर	18
रोहा	18
श्रीवर्धन	11
सुधागड	8
तळा	18
उरण	5
एकूण	235

श्रीवर्धनमधील स्मशानभूमीत जादूटोण्याचा प्रकार

नागरिकांनी पाच जणांना रंगेहाथ पकडले

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन शहरातील दांडा परिसरात समुद्रकिनारी असलेल्या स्मशानभूमीमध्ये जादूटोण्याचा प्रकार उघडकीस आला असून, स्थानिक नागरिकांनी पाच जणांना त्या ठिकाणी जादूटोण्याचा प्रकार करताना रंगेहात पकडले आहे. जादूटोण्याच्या प्रकारासाठी नारळ, लिंबू, काळ्या बाहुल्या व लिंबाला टाचणीने चिकटवलेले फोटो, एक रिकामी दारूची बाटली असे साहित्य त्या ठिकाणी पोलिसांनी हस्तगत केले आहे. हे पाचजण पुणे परिसरातील असून, त्यांची इनोवा कार देखील पोलिसांनी ताब्यात घेतली आहे. तसेच, यातील एकजण पुण्यातील एका मठामध्ये पुजाऱ्याचे काम करत असल्याबाबत माहिती समोर आली आहे.



जादूटोण्याच्या या अघोरी प्रकारासाठी नारळाला लाल व पांढऱ्या रंगाचे धागे व त्यासोबत काळ्या बाहुल्या, लिंबू इत्यादी पदार्थ गुंडाळून ज्या ठिकाणी स्मशानभूमीमध्ये मृतदेह दहन केले जातात त्या ठिकाणी व आजूबाजूच्या परिसरात टाकण्यात आलेले होते. या प्रकरणात एका महिलेला तिच्या सासरी नांदवून घेत नसल्यामुळे तिला पुन्हा नवऱ्याकडे नांदायला पाठवण्यासाठी जादूटोण्याचा प्रकार करत असल्याची माहिती देखील समोर आली आहे. मागील वर्षभरापासून दांडा येथील स्मशानभूमीमध्ये अनेक वेळा अशा प्रकारे आघोरी कृत्य करण्याचे प्रकार घडले होते. या अगोदर देखील नारळ, लिंबू, फोटो असे प्रकार •➤पान २ वर

दुचाकीस्वाराची कारला धडक



। महाड । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा महामार्गावरील नागलवाडी येथील पुलावर रविवारी (दि.२५) रात्री १० वाजताच्या सुमारास दुचाकीची व कारची समोरासमोर धडक झाली. या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला असून, दुचाकीची अक्षरक्षः चिंधड्या उडाल्या आहेत. तर कारचालकही जखमी झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील महाड जवळील नागलवाडी फाटा येथील उड्डाण पुलावर •➤पान २ वर

खारघरमध्ये ड्रग्ज रॅकेटचा पर्दाफाश

२४४ ग्रॅम गांजा, ३.५ ग्रॅम एमडी जप्त

। कळंबोली । प्रतिनिधी ।

नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेअंतर्गत येणाऱ्या अमली पदार्थविरोधी कक्षाने खारघर परिसरात धडक कारवाई करत अमली पदार्थांच्या अवैध व्यापाराला मोठा दणका दिला आहे. बेलपाडा आणि कोपरा गाव परिसरातील तीन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून पोलिसांनी २४४ ग्रॅम गांजा आणि ३.५ ग्रॅम एमडी असा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत महिलेसह तीन संशयित आरोपींना अटक करण्यात आली असून, एक संशयित आरोपी घटनास्थळावरून पसार झाला आहे.

बेलपाडा परिसरातील कारवाईत पोलिसांनी अफसाना बी. अजीज शेख (५०) आणि फैजान



अब्दुल वाहिद अन्सारी (२५) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून १७ ग्रॅम गांजा आणि ३.५ ग्रॅम एमडी जप्त करण्यात आले. तर कोपरा गावात केलेल्या कारवाईत अनुसया बराल (५०) हिच्याकडून तब्बल २२७ ग्रॅम गांजा हस्तगत करण्यात आला. अशा प्रकारे दोन्ही कारवायांमध्ये एकूण २४४ ग्रॅम गांजा व ३.५ ग्रॅम एमडी जप्त करण्यात आले. दरम्यान, कोपरा गावातील कारवाईदरम्यान जलालुद्दीन •➤पान २ वर

दिवेआगर-वेळासआगर खाडीपूल वगळला की रखडला?

। बोर्ली पंचतन । प्रतिनिधी ।

रेवस-रेड्डी सागरी महामार्गाच्या अंतिम आराखड्यात वेळासआगर-दिवेआगर खाडीपुलाचा समावेश होणार की नाही, याबाबत अद्याप संभ्रम कायम आहे. सागरी महामार्गाची मूळ संकल्पना कायम असून, किनारपट्टीवरील रस्त्यांची आखणी निश्चित झाल्यानंतर हा खाडीपूल पुन्हा प्रस्तावित करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती खासदार सुनील तटकरे यांनी दिली. त्यांच्या या भूमिकेमुळे अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या पुलाच्या उभारणीबाबत स्थानिकांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.

रेवस ते रेड्डी असा सुमारे ४९८ किलोमीटर लांबीचा प्रस्तावित सागरी महामार्ग रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यांना जोडणार आहे. या प्रकल्पांतर्गत मुरुड तालुक्यातील टोकेखार ते म्हसळा तालुक्यातील तुरुंबाडी •➤पान २ वर



कारच्या धडकेत सायकलस्वाराचा मृत्यू

। कोलाड । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा महामार्गावरील पुई गावानजिकच्या इंडियन ऑइल पेट्रोल पंपासमोर टाटा कारची सायकलस्वाराला जोरदार धडक बसली. या धडकेत सायकलस्वारचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी (दि.२५) दुपारच्या सुमारास पुई गावानजिकच्या इंडियन ऑइल पेट्रोल पंपासमोर सायकलस्वार रविंद्र विठ्ठल मांजरे (४८) हे गोवे गावाकडे जात होते. त्यावेळी मुंबईकडे कारने जाणारे गिरीष जाधव (५०) यांनी सायकलस्वार रविंद्र मांजरे यांना पाठीमागून ठोकर मारून अपघात केला. या अपघातात सायकलस्वार रविंद्र मांजरे यांना गंभीर होऊन त्यांचा मृत्यू झाला.

आंबेघर येथील शेतकरी रस्त्यावर

अलिबाग तहसील कार्यालयासमोर उपोषण

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

भरावामुळे शेत जमीनीचे प्रचंड नुकसान झाले असून, त्याची १८ हजार रुपयांची भरपाई देण्यास भराव करणाऱ्या मंडळीनी दिरंगाई केली. त्यामुळे संतप्त झालेले शेतकरी किरण पाटील न्यायासाठी रस्त्यावर उतरले आहेत. त्यांनी त्यांच्या मागणीसाठी सोमवार दि.२६ ऑक्टोबरपासून अलिबाग तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरु केले आहे. वयोवृद्ध असलेल्या या शेतकऱ्याला तहसीलदार न्याय देतील का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अलिबाग तालुक्यातील आंबेघर येथील किरण वामन पाटील हे



शेतकरी आहेत. गट नं. २८/२ क्षेत्र ०.२७.८० हे.आर या जमीन मिळकतीमध्ये काही मंडळींनी भराव केला आहे. त्यामुळे किरण पाटील या शेतकऱ्याच्या शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. याबाबत त्यांनी अलिबाग तहसील कार्यालयात तक्रार केली. त्यानंतर ११ मे २०२४ व १९ जून २०२५ रोजी मंडळ अधिकारी आणि तलाठी यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. पंचनामा करूनही कोणतीही कार्यवाही प्रशासनाकडून झाली नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्याने १० ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करणार, असा इशारा प्रशासनाला दिला होता. याबाबत पत्र देण्यात आले होते. उपोषणाच्या इशाऱ्यानंतर अलिबागच्या तहसीलदारांनी ९ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी कार्यालयात बैठक घेतली. या बैठकीत शेतकऱ्यासह भराव करणारी मंडळी होती. तहसीलदारांनी दोन्ही म्हणणे ऐकून घेतल्यावर त्यांच्या मध्यस्थीने भरपाई म्हणून •➤पान २ वर

अधिकाऱ्याला बेदम मारहाण

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

किरकोळ कारणावरून अलिबागमधील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंत्याला मारहाण केल्याचा प्रकार अलिबागमध्ये घडला. रेस्ट हाऊसच्या प्रवेशद्वासमोर ही घटना शनिवारी दुपारी घडली. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दिनेश परते असे या बांधकाम अधिकाऱ्याचे नाव आहे. अलिबागमधील सार्वजनिक बांधकाम विभागातील उपअभियंता म्हणून गेल्या अनेक महिन्यांपासून ते काम पहात आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या •➤पान २ वर

चित्रलेखा पाटील यांच्यासह दिग्गज मंडळींची उपस्थिती | अलिबागमध्ये रंगला सोहळा

संगीतमय उत्सवात महागरब्याचा आनंद

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी।

नवरात्रौत्सवानंतर कोजागिरी पौर्णिमेच्या शुभ मुहूर्तावर रविवारी (दि.२५) अलिबागमध्ये महागरबा महोत्सवाचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले होते. चित्रलेखाताई पाटील पुरस्कृत पीएनपी सांस्कृतिक कलाविकास मंडळ अलिबाग आणि चेंढरे मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हा सोहळा रंगला. या संगीतमय उत्सवात शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्यासह अनेक राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा अशा सर्वच क्षेत्रातील मान्यवरांनी तसेच तरुण तरुणांनी, ग्रामस्थ पारंपरिक पोशाखात एकत्र येऊन महागरब्याचा आनंद लुटला.



(छायाचित्र : समीर मालोदे)

यावेळी जिल्हा सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयाच्या कार्याध्यक्षा शैला पाटील, वृषाली ठोसर, ॲड. अश्वीनी ठोसर, शेकाप तालुका महिला आघाडी प्रमुख नागेश्वरी हेमाडे, अलिबाग पंचायत समिती सदस्या अंजली ठाकूर, अलिबाग नगरपरिषदेचे पाणी सभापती अनिल चोपडा, डॉ. साक्षी पाटील, संजना कीर, ॲड. निवेदिता वाघमारे, जमाल सय्यद, ॲड. परेश देशमुख, चेंढरेचे माजी सरपंच दत्ता ढवळे, युवा नेतृत्व हर्ष ढवळे, अलिबाग तालुका पुरोगामी युवक प्रमुख विक्रांत वार्डे आदींसह वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळी आणि तरुण-तरुणी उपस्थित होते.

शेकापच्यावतीने पीएनपी नाट्यगृहाच्या परिसरात आयोजित करण्यात आलेल्या महागरब्यात अनेक मंडळी सहभाग घेतला. गाण्यांच्या सुरावर ठेका घेऊन प्रत्येकजण आपल्या शैलीमध्ये गरब्याचे सादरीकरण करीत होते. नवरात्री संपल्यानंतरही कोजागिरीच्या दुग्धशर्करा रात्रीत गरब्याचा आणि दांडियाचा रंग अधिकच गडद झाला होता. चंद्रप्रकाशाच्या साक्षीने हजारो तरुण-तरुणी पारंपरिक पोशाखात एकत्र येऊन या संगीतमय उत्सवाचा आनंद घेत होते.

कोजागिरीची शांत, आल्हाददायक रात्र आणि गरब्याचा जल्लोष यांचा एक सुंदर संगम या निमित्ताने पाहायला मिळाला. पारंपरिक आणि आधुनिक संगीताच्या तालावर चालणाऱ्या पारंपरिक गरब्यासोबतच आधुनिक डीजे आणि लाइव्ह बँडच्या गाण्यांवर अनेकजण थिरकत होते. रात्री उशिरापर्यंत चालणारा महागरबा या महोत्सवांचे मुख्य आकर्षण ठरले. यावेळी गरबा किंग योगेश पवार हे ठरले असून, गरबा क्विन राजेश्री कोळी या ठरल्या आहेत.

दरम्यान, नृत्यांचे सादरीकरण होत असताना या कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेकांचा गौरवही करण्यात आला. अलिबागमधील अस्थीरोग तज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर साठ्ये यांनी पॅरिस ते मुंबईच्या विमान प्रवासात एका वयोवृद्ध प्रवाशाला जीवनदान दिले. त्यांच्या या कार्याचे कौतूक म्हणून शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते डॉ. साठ्ये यांचा सन्मान करण्यात आला.

(संबंधित छायाचित्र ३ वर)

राहुल गांधींची निर्दोष मुक्तता

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

''प्रामाणिकपणा याबद्दल बोलणाऱ्या पक्षाच्या अध्यक्षांवर खुनाचा आरोप आहे'' या राहुल गांधी यांच्या विधानावर साडेसात वर्षांपूर्वी गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यांच्याविरोधात मानहानीचा खटला दाखल करण्यात आला होता. तथापि, उत्तर प्रदेशातील सुलतानपूर येथील खासदार-आमदार न्यायालयाने ते मानहानीकारक मानले नाही आणि दि.२६ ऑक्टोबर रोजी त्यांची निर्दोष मुक्तता केली. राहुल न्यायालयात हजर झाले आणि अवघ्या १६ मिनिटांत निकाल लागला. पहिले, राहुल यांनी न्यायालयात सादर केलेली त्यांच्या संपूर्ण विधानाची सीडी हा एक सबळ पुरावा मानला गेला. कोणाचीही बदनामी करण्याचा आपला हेतू नव्हता, असे राहुल यांनी म्हटले होते.

मेगावॅटच्या नावाखाली 'मेगा वाट'

वृक्षतोडीवरुन आदित्य ठाकरेंचा संताप



। नेरळ/कर्जत । प्रतिनिधी ।

राज्यात महाकुंभमेळाच्या पार्श्वभूमीवर मोठी वृक्षतोड करण्यात आली होती, या वृक्षतोडीवरुन नाशिकमध्ये नागरिकांनी आणि पर्यावरणप्रेमींना तीव्र संताप व्यक्त केला होता. त्यातच आता, भिमाशंकरच्या डोंगररांगातील कर्जतच्या साय डोंगररागेत असलेल्या वृक्षांची तोड केली जात आहे. यावरुन, पर्यावरणप्रेमी संतप्त झाले आहेत. विकासाच्या नावाखाली पर्यावरणाची राख करून कर्जतमधील ३२ हजार झाडे तोडली जाणार आहेत. आतापर्यंत हजारो भल्यामोठ्या झाडांची कत्तल करण्यात आल्याने संतापाचा उद्रेक झाला आहे. त्याच पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी साय डोंगरातील वृक्षतोडीच्या ठिकाणी भेट दिली. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना लक्ष्य केल. •➤पान २ वर

पान १ वरुन

वरदविनायक मंदिर तीन महिने बंद

नुकतेच उद्घाटन करण्यात आले आहे. या कामादरम्यान, ऐतिहासिक महत्त्व असलेला मुख्य मंदिराचा गाभारा सुरक्षित ठेवून, त्याभोवतालचे इतर सर्व जुने बांधकाम जमीनदोस्त करण्यात येणार आहे. हे बांधकाम सुरू असताना भाविकांची सुरक्षा धोक्यात येऊ नये आणि कामाचा वेग वाढावा, यासाठी मंदिर प्रशासनाने व पुरातत्त्व विभागाने पुढील तीन महिने मंदिर दर्शनासाठी पूर्णतः बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी दोन दशकांपूर्वी महड मंदिराचा जीर्णोद्धार करताना काँक्रीटचा वापर करण्यात आला होता. मात्र, आता पुरातत्त्व विभाग आणि शासनाने यासाठी जवळपास २८ कोटी रुपयांचा विशेष निधी मंजूर केला असून, हे संपूर्ण मंदिर ऐतिहासिक व पारंपरिक हेमाडपंती शैलीत दगडी बांधकामात साकारले जाणार आहे. मंदिराचा हा भव्य कायापालट पूर्ण होण्यासाठी साधारण ३ वर्षांचा कालावधी लागणार असला, तरी सुरुवातीचे मुख्य बांधकाम लक्षात घेता पहिल्या ३ महिन्यांसाठी मंदिर पूर्ण बंद असेल.

श्रीवर्धनमधील स्मशानभूमीत जादूटोण्याचा प्रकार

स्मशानभूमीत मृतदेह दहन केल्यानंतर लगेचच करण्यात येत होते. मात्र, हे प्रकार कोण करत होते? याबाबत उकल होत नव्हती. मात्र, सोमवारी (दि.२६) दुपारी पावणेबारा वाजण्याच्या सुमारास पुणे येथील पाच जणं दांडा येथील स्मशानभूमीमध्ये अघोरी कृत्य करत असल्याचे नागरिकांच्या लक्षात आले. त्यानंतर नागरिकांनी पोलिसांना पाचारण केले. पोलिसांनी जागेवर येऊन सर्व वस्तू हस्तगत करून आरोपींना वाहनासह ताब्यात घेतले आहे.

मागील वर्षभरापासून अमावस्या, पौर्णिमा किंवा कोणाचाही मृत्यू झाल्यानंतर स्मशानभूमीमध्ये अशा प्रकारचे अघोरी प्रकार होत असल्याबद्दल नागरिकांमध्ये भीती निर्माण झाली होती. परंतु, हे कृत्य करणारे हे बाहेरील नागरिक असल्यामुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास टाकला आहे. या प्रकरणामध्ये तीन पुरुष व दोन महिला पोलिसांच्या ताब्यात असून, गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया अद्याप सुरू आहे. या कृत्यामध्ये अजुन कोणी सहभागी आहे का? याचा देखील शोध घेतला जात आहे. या प्रकरणातील आरोपींवर अंधश्रद्धा निर्मूलन कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

खारघरमध्ये ड्रग्ज रॅकेटचा पर्दाफाश

नावाचा संशयित आरोपी पोलिसांची चाहूल लागताच घटनास्थळावरून पसार झाला. त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला आहे. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, जप्त करण्यात आलेले ड्रग्ज आणखी कुठून आणि कोणाच्या माध्यमातून आले, तसेच या प्रकरणामागे मोठे तस्करीचे जाळे आहे का, याचा तपास पोलीस करत आहेत.

दुचाकीस्वाराची कारला धडक

स्कोडा कंपनीची कार चालक अमीर अहमद काझीम (२२) हे गोव्याच्या दिशेने जात होते. त्यावेळी दुचाकीस्वार दानिश इकबाल पालटे (४०) हे विरुद्ध दिशेने वेगाने दुचाकी चालवत आले आणि अमीर काझीम यांच्या कारला समोरून जोरदार धडक दिली. या धडकेत दुचाकीस्वार दानिश पालटे हे गंभीर दुखापत झाल्याने त्यांना महाड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी अंती त्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट केले. या अपघाताची घटना समजताच महामार्ग वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर ढाकणे, पोलीस हवालदार पवार, पोलीस शिपाई भोसले व शेळके यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर रस्त्यावर झालेली वाहतूक कोंडी दूर करून महाड औद्योगिक वसाहत पोलीस ठाण्याच्या सहकार्याने अपघातग्रस्तांना रुग्णालयात दाखल केले.

अधिकाऱ्याला बेदम मारहाण

अधिकाऱ्यांसह काही ठेकेदारांची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी बांधकाम विभागाच्या रेस्ट हाऊसच्या प्रवेशद्वाराजवळ एक महिला व पुरुष दोघेजण वाद घालत होते. वाद घालू नका बाहेर जा, असे परते यांनी त्यांना सांगितले. याचा राग धरून कांबळे नामक पुरुषाने परातेंची कॉलर पकडून त्यांना ढकलून दिले. त्यानंतर काही मंडळींनी घेऊन पुन्हा रेस्ट हाऊसजवळ आले. त्यावेळीदेखील परते यांना मंडळींच्या मदतीने मारहाण व शिवीगाळी केली. ही घटना शनिवारी (दि.२४) दुपारी एक वाजण्याच्या सुमारास घडल्याची माहिती पोलिसांकडून मिळाली आहे. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात दिनेश परते यांनी तक्रार केली आहे.

आंबेघर येथील शेतकरी रस्त्यावर

म्हणून ६० हजार रुपये देण्याचे त्या मंडळींनी मान्य केले. यापैकी ४२ हजार रुपये ८ डिसेंबर २०२५ रोजी दिले. उर्वरित १८ हजार रुपये अजूनपर्यंत दिले नाहीत. त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्याने न्यायासाठी अलिबाग तहसील कार्यालयासमोर उपोषणाला बसण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सोमवारी (दि.२६) किरण पाटील या शेतकऱ्याने अलिबाग तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरु केले आहे. याबाबत अलिबागचे तहसीलदार विक्रम पाटील यांच्याशी संपर्क साधला, मात्र तो होऊ शकला नाही.

मेगावॅटच्या नावाखाली 'मेगा वाट'

गुजराती टोरेंट पॉवर कंपनीच्या प्रस्तावित जलविद्युत ऊर्जा साठवण प्रकल्पाला पक्षपातीपणा दाखवल्याचा आरोप महायुती सरकारवर होत आहे. या प्रकल्पासाठी कर्जत-भीमाशंकरच्या जंगलातील अंदाजे ३ लाख झाडे तोडली जातील, असा दावा स्थानिकांकडून होत आहे. भीमाशंकरच्या जंगलातील या वृक्षतोडीवरुन राजकीय वातावरणही तापलं असून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी कर्जत येथे जंगलतोड होत असलेल्या ठिकाणी भेट दिली. तसेच, ''मरण आले तरी चालेल, पण हा लढा आता थांबणार नाही,'' अशा शब्दांत आदित्य ठाकरेंनी सरकारला इशारा दिला आहे. ते म्हणाले की, तुम्ही मेगावॅट मेगावॅट म्हणताय पण तुम्ही, येथे मेगा वाट लावत आहात. कंपनी कुठली, तर गुजरातची. दुष्काळ जाहीर केल्यानंतर आता येथे वृक्षतोड करून येथे सुद्धा फडणवीस दुष्काळ जाहीर करतील, असे म्हणत आदित्य ठाकरेंनी कर्जतमधील साय डोंगर प्रदेशातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना लक्ष्य केले. भाजपच्या मालक असलेल्या कंपन्यांनाना हे काम दिले जात आहे, तुम्हाला चेक सुद्धा दिले जातील. ते आमदार, खासदारांना खरेदी करतात तर तुमचे काय? भकास करून विकास होणार नाही. मुख्यमंत्री पारदर्शक तुमचा आवडता शब्द, आता पारदर्शकपणे सांगा सुनावणी घेतली होती की नाही? आणि पर्याय कुठले नेमले होते? सुनावणीमध्ये हरकती घेतल्या त्याचं काय? असे अनेक सवाल आदित्य ठाकरेंनी मुख्यमंत्र्यांना विचारले आहेत.

आमच्या महाराष्ट्राची जमीन विकू देणार नाही, मरण आला तरी चालेल पण हा लढा थांबता कामा नये, असे म्हणत आदित्य ठाकरेंनी पर्यावरण रक्षणासाठी आणि जंगलतोडीसाठी आपला तीव्र विरोध असल्याचे दाखवून दिले. तुमचा अभिनंदन तुम्ही वृक्षतोड थांबवली, तुम्ही सुद्धा इथे चिपको आंदोलन करा. जे कट्टर येतील ते तोडा, फेका. आपल्या जंगलाला हात लावू द्यायचा नाही, असे म्हणत स्थानिकांचे कौतुक करत त्यांना हे आंदोलन तीव्र करण्याचेही आदित्य ठाकरे यांनी सूचवले आहे. यावेळी शिवसेना सचिव अनिल परब, उपनेत्या सुषमा अंधारे तसेच बबन पाटील, जिल्हा प्रमुख मनोहर भोईर, जिल्हा संपर्क प्रमुख प्रसाद भोईर, उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत, तालुका प्रमुख बाजीराव दळवी, महिला जिल्हा संघटक सुवर्णा जोशी, मतदारसंघ संघटक सुनीता मोरे, जिल्हा परिषद सदस्य बाबू घारे, तालुका संघटक रामदास घरत आदींसह मोठ्या प्रमाणात शिवसैनिक उपस्थित होते.

दिवेआगर-वेळासआगर खाडीपूल वगळला की रखडला?

(दिघी खोडी), तसेच श्रीवर्धन तालुक्यातील कोलमांडले ते रत्नागिरी जिल्ह्यातील वेश्वी (बाणकोट खाडी) या पुलांची कामे सुरू झाली आहेत. मात्र, वेळासआगर-दिवेआगर खाडीवरील प्रस्तावित पुलाबाबत अद्याप ठोस हालचाल दिसून येत नसल्याने प्रश्नचिन्ह कायम आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने २४ एप्रिल २०२३ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार वेळासआगर खाडीपूल, भरडखोल, शेखाडी, कोंडविल इत्यादी किनारपट्टीवरील गावांना वगळून हा महामार्ग वडवली, शिस्ते, कापोली, बोर्लीपंचतन, दिवेआगर, कार्ले, खुजारे, दांडगुरी, चिखलप, भट्टीचा माळ, हरिहरेश्वर आणि दांडा मार्गे बाणकोटकडे नेण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले होते. या अधिसूचनेमुळे वेळासआगर-दिवेआगर खाडीपूल सागरी महामार्गाच्या आराखड्यातून वगळण्यात आला आहे की त्याचे काम पुढील टप्प्यात प्रस्तावित आहे याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

किनारपट्टीवरील गावे आणि पर्यटनस्थळांना जोडणे, प्रवास सुलभ करणे आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणे हा सागरी महामार्गामागील महत्त्वाचा उद्देश आहे. त्यामुळे समुद्रकिनाऱ्यालगतच्या मार्गाऐवजी पर्यायी मार्गाचा अवलंब केल्यास महामार्गाच्या मूळ संकल्पनेलाच बाधा पोहोचण्याची शक्यता असल्याची भूमिका खासदार सुनील तटकरे यांनी मांडली. समुद्रकिनाऱ्यावरील रस्त्यांची आखणी निश्चित झाल्यानंतर वेळासआगर-दिवेआगर खाडीपूल पुन्हा प्रस्तावित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

२० हजार विद्यार्थी धोक्यात

उपलब्ध असल्याची माहिती आहे. त्यामध्ये जिल्हा परिषद सेस फंडातून ४ कोटी ६० लाख रुपये, जिल्हा नियोजन समितीकडून २६ कोटी ५० लाख रुपये, पंधराव्या वित्त आयोगातून ४ कोटी ५८ लाख रुपये, तर समग्र शिक्षा अभियान व इतर उपक्रमांतून ७९ लाख रुपये उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले आहे. इतका निधी उपलब्ध असतानाही शाळांच्या दुरुस्तीची कामे प्रलंबित का आहेत? कोणत्या शाळांच्या दुरुस्तीला मंजुरी मिळाली? किती कामे सुरू झाली आणि किती कामांसाठी निधी खर्च झाला? दुरुस्तीची कामे रखडण्यामागे प्रशासकीय दिरंगाई आहे की निधीच्या वितरणातील अडचणी, याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

२३५ इमारतींसाठी ५३ कोटींची गरज

जिल्ह्यातील २३५ शाळांच्या इमारती अतिधोकादायक स्थितीत असल्याचे आकडेवारीतून समोर आले आहे. या इमारती पूर्णपणे जीर्ण झाल्याने काही ठिकाणी विद्यार्थ्यांना समाजमंदिर किंवा अन्य पर्यायी ठिकाणी बसवून शिक्षण द्यावे लागत असल्याचे सांगण्यात येते. या इमारतींची पुनर्बांधणी आणि आवश्यक वर्गखोल्यांचे बांधकाम करण्यासाठी अतिरिक्त निधीची गरज आहे. त्यासाठी सुमारे ५३ कोटी रुपयांचा निधी आवश्यक असल्याची माहिती समोर आली आहे.

खारपाडा टोल नाक्यावर हाणामारी

तपास सुरू केला. कोकणातून प्रवाशांना घेऊन मुंबईच्या दिशेने जाणारा बसचा टोल भरण्यावरून टोल कर्मचारी व बस मधील प्रवाशांमध्ये वाद झाला. हा वाद इतका विकोपास गेला की टोल कर्मचारी व प्रवाशांमध्ये बाचाबाची होऊन फ्री स्टाईल हाणामारी सुरू झाली. या घटनेची माहिती समजल्यानंतर या ठिकाणी मोठी गर्दी झाली आणि एकमेकांवर हल्ला करण्यात आला. त्यामुळे काही काळ या भागात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पनवेल तालुका पोलिसांनी घटनास्थळी येत येथील परिस्थिती नियंत्रणात आणली. मात्र याप्रकरणी कोणताही गुन्हा दाखल झाला नव्हता.

ऑडियो क्लिप प्रकरणी एसआयटीची स्थापना

छक्के-पंजे खेळू नका, तर या चौकशीच्या मुळाशी जाणे गरजेचे आहे,'' असा खोचक सल्ला जरांगे यांनी मुख्यमंत्र्यांना दिला आहे. तसेच, ही ऑडिओ क्लिप कोणतीही एआय जनरेटेड नसून १०० टक्के खरी असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. एवढी मोठी क्लिप एआयच्या माध्यमातून बनवताच येत नाही, असा दावाही त्यांनी केला.

बाळाला थेट स्कायवॉकवरुन फेकलं

नाव आरती जाफर शेख (२२) असे आहे. सुमारे दोन वर्षांपूर्वी तिचा विवाह जाफर शेख (२३) याच्याशी विवाह झाला होता. या दाम्पत्याला आरव नावाचा नऊ महिन्यांचा मुलगा आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जाफरला नशा करण्याचे व्यसन असल्याने पती-पत्नीमध्ये गेल्या काही महिन्यांपासून वारंवार वाद होत होते. रविवारीदेखील दोघांमध्ये जोरदार वाद झाला होता. त्यानंतर ही घटना घडल्याचे समोर आले आहे.

अनिल तेंडुलकर यांचे निधन



रोहा : रोहा-अष्टमी नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष आणि रोहा-अष्टमी अर्बन बँकेचे माजी व्यवस्थापकीय संचालक अनिल तेंडुलकर (६६) यांचे गुरुवारी (दि.२२)निधन झाले. त्यांच्यावर शुक्रवारी (दि.२३) रोहा वैकुंठधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवरांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. त्यांनी चार दशकांहून अधिक काळ व्यावसायिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रांत आपल्या कार्याचा ठसा उमटविला होता. तसेच रोहा-अष्टमी अर्बन बँकेच्या व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळताना त्यांनी आपल्या कार्यशैलीची छाप पाडली.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय
कॉंग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

जा.क्र. निउनि/गृह/मोफा क्र. ११/मा. अधि./जाहीर नोटीस/२०३०/सन २०२६ दिनांक :- २३/१०/२०२६

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस

वृंदावन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड तर्फे अध्यक्ष राजेंद्र भास्कर नाईक यांनी मे रायगड रियल्टर्स तर्फे पार्टनर, श्री मोहन मधुकर कर्णिक, रा. ११२, शामकमल, डी अग्रवाल मार्केट, विलेपार्ले, मुंबई- ४०००५७ यांचे विरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११ (३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानीव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

मालमत्तेचे वर्णन
रायगड जिल्ह्यातील ता.अलिबाग, अलिबाग येथील भूमापन क्रमांक व उपविभाग - १३/१/अ/१, क्षेत्र ६१६.८८ चौ.मी.

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतीम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावीत कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक ०५/११/२०२६ रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक- २३/१०/२०२६

सही/-
(त.सं.पाटील)
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, रायगड अलिबाग

दिनांक : २७ ऑक्टोबर २०२६

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी श्री. १) देवेश प्रकाश महादे, २) रमाकांत हरी महादे, ३) सदानंद हरी महादे, रा. मु. पिसार्वे, पो. तलोजा, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०८. यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट
मौजे - कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.-पॉ.	पोटखराबा	आकार रुपये	आकार पैसे
१) अभय उदय पाटील	१	२	०-३५-००	०-०२-००	०	३४
२) उत्कर्षा प्रवीण जाधव	एकुण क्षेत्र हे ० आर ३७ पॉ मात्र.					

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, ता. कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
ॲड. भुपेश तानाजी पेमारे
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- २७/१०/२०२६

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, मौजे सांगडे, ता.पनवेल, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही माझे अशिल खरेदीखताने मालकीहक्काने कायमस्वरूपी विकत घेण्याचा विचार करीत आहेत.

वरीलप्रमाणे परीशिष्ट
मौजे - सांगडे, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड

मालकाचे नाव	गट नं. व उपविभाग क्र	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
१ श्री. रवि मोतिराम पाटील	१३८/२	एकुण क्षेत्र ०.१४.००	०.५६
२.श्री.बळीराम मोतिराम पाटील			
३. सौ.आनंदी मोतिराम पाटील			
४. सौ.नंदा सिताराम मुंढे			
५. सौ.कुंदा गणेश म्हात्रे			
६. श्री.तुकाराम बुधाजी पाटील			
७. श्री.मच्छिद्रनाथ बाळाराम पाटील			
८. सौ. सुंगधा बाळाराम पाटील			
९. श्री.रंगनाथ बाळाराम पाटील			
१०.सौ.जलवंती बारकु पाटील			
११.श्री.अजित बारकु पाटील			
१२.श्री. अंजना जितेंद्र चौधरी			
१३.श्रीमती.जनाबाई शांताराम गायकर			
सर्व रा.मौजे सांगडे, ता.पनवेल			

सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील परिशिष्टातील वर्णन केलेल्या मिळकती मधील हक्क, हितसंबंध व अधिकार आणि/किंवा इतर फायदे याबाबत ज्या कुणाची समझोता करार साठेकरार, विकसनकरार, फरोक्त, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, चार्ज, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, ताबा, कुळ, वहिवाट, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन किंवा इतर बाबींद्वारे हरकत, तक्रार दावा, हितसंबंध असेल तर त्यांनी तशा प्रकारची हरकत, तक्रार, दावा, हितसंबध ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून खालील सही करणार यांच्या खालील पत्त्यावर २१ (एकविस) दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह सादर करावी. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा वगैरे न आल्यास वरील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती या निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा, हितसंबंध नाही असे समजून माझे अशिल वरील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार दावा माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक :- २६/१०/२०२६

KISHORA. DHAKAD
(ADVOCATE HIGH COURT)
Add-Office No.21, Muncipal Complex,
Near Vasudev Balvant Fadke Natyagruha,
At-Panvel, Taluka-Panvel 410206
Email-kishordhakad@yahoo.co.in
Mobile No. 9867051330

Rashtriya Aarogya Nyaya Sanshodhan Sanstha's
Raigad Institute of Nursing Education Murud
A/p- Murud Tal-Murud Dist-Raigad, Maharashtra-402401
Admission Notification 2026-2027

Application invited from eligible MH B.Sc. Nursing CET Registered Candidates for filling up for Admission to B.Sc. Nursing, Under Institute level Round/Residual Quota.

Tentative Schedule for Institute Level Round forAdmission to B.Sc. Nursing Course in Private College

1	Publication of Seat Matrix for Institutional Level Round and Provisional List of Eligible candidates for Institutional Level round	27/10/2026
2	The eligible desirous candidate must apply in person/any person to respective college in prescribe format.	28/10/2026 to 29/10/2026 Up to 05.30 pm
3	Publication of General Merit List and Quota Wise Merit list, Selection List-1 and Wait List separately at notice board and the web site of respective Colleges.	29/10/2026 By 06.30 PM
4	Physical Joining and Filling Status Retention of candidates from Selection List-1 dated 29/10/2026 by submitting all original Documents & payment of Requisite Fees by DD/ Cheque.	30/10/2026 Up to 05.30 PM
5	Publication of Residual vacancy at notice board and the web site of respective Colleges.	30/10/2026 by 06.30 pm
6	Reporting of eligible candidates with Original Documents and Requisite Fees to college for Residual Vacancy. Candidates should enquire with the college regarding mode of payment of fees in advance to avoid last minute trouble.	31/10/2026
7	Filling Residual Vacancy from reported eligible candidates from list published on the website on the basis of merit.	31/10/2026 03.30 pm onwards
8	Reporting of admitted candidates in College Feedback Module	31/10/2026
11	Cut-off date of admission for B.Sc. Nursing Course for Academic Year 2026-2027 as per Indian Nursing Council	31/10/2026

For Eligibility criteria and more details visit. www.mahacet.org and 2026 Brochure
Contact- Mobile-8830869202/9819071198/9270209520/9545989836
E-Mail-raigadine@gmail.com

Mr. Tushar Divekar
Administrative Officer.

Dr. Nootan R Mali
Principal



प्रथम क्रमांक
१) सौ. रश्मी अपुर्व पाटील, पेझारी
२) श्री. गजानन त्रिंबक म्हात्रे, थळ
३) श्री. योगेश प्रकाश वार्डे, रांजणपाडा-आवास
४) श्री. अनिल नारायण वर्तक, वरसोली
५) श्री. विनोद मेहेता, माणगाव
६) श्री. अजिंक्य शेळके, डोंगरी-मुरुड
७) श्री. पांडूरंग विष्णू घरत, लोणारे-थळ
८) श्री. पांडूरंग आरेकर, मुरुड
९) श्री. प्रथमेश दत्ताराम पाटील, दिवीपारंगी-अलिबाग
१०) श्री. चेतन संजय घरत, वरसोली-अलिबाग

द्वितीय क्रमांक
१) सौ. मितल राजेंद्र नाईक, रेवदंडा
२) श्री. संतोष खडतर, चेरवली-माणगाव
३) श्री. रोशन शिवराम म्हसकर, नार्पोली-पनवेल
४) श्री. प्रकाशदादा ठाकूर, झिराड
५) श्री. राजाराम दामोदर पाटील, डावळे-नागाव
६) श्री. मनोज सदाशिव भवारे, दहिवली-नेरळ
७) सौ. छाया विलास भिडे, पेण
८) मोंढे कुटूंब, मुनवली-अलिबाग
९) श्री. अनंत विष्णू पाटील, रामनाथ-अलिबाग
१०) श्री. समीर सावंत, तळवडे(गोठेघर) अलिबाग

विजेत्यांनी आपले बक्षीस २२ ऑक्टोबर ते २८ ऑक्टोबर २०२६ पर्यंत दु. १२ ते सायं. ४ या कालावधीत कृषीवल कार्यालयातून येऊन घेऊन जाणे.

टीप : विजेत्यांनी येताना आपले फोटो असलेले ओळखपत्र सोबत घेऊन येणे.

पत्ता : कृषीवल कार्यालय, वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०

दि. २६/१०/२०२६.

अर्जदारतर्फे वकील ॲड.प्रथमेश पोतदार

अलिबाग येथील सिव्हील जज सिनिअर डिव्हिजन यांचे कोर्टात.

दिवाणी चौकशी अर्ज.१४८/२०२६

श्रीमती. जयश्री बहेन दिनेश गंगावणे
वय -४३ वर्षे, व्यवसाय - गृहिणी, अर्जदार
रा. राग सुधा बिल्डिंग, गांधी नगर,
जय भवानी किराणा शॉप जवळ, डोंबिवली (पुर्व), ठाणे-४२१२०१.

व

सध्या रा.रुम नं.२०१, साईसुधा अपार्टमेंट,
हॉटेल रविकिरणच्या शेजारी,
विद्यानगर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.
आधार नं.२७६३ ६३८१ ९१८५.

विरुद्ध

कोणीही नाही. सामनेवाले

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

अर्जदार यांचे पती कै. दिनेश रविंद्र गंगावणे हे होते. कै. दिनेश रविंद्र गंगावणे हे दि.३०/१२/२०२५ रोजी मयत झाले आहेत.

अर्जदार व त्यांचे पती कै. दिनेश रविंद्र गंगावणे हे आपल्या कुटुंबासह बऱ्याच वर्षापासून मु.रा.रुम नं. २०१, साईसुधा अपार्टमेंट, हॉटेल रविकिरणच्या शेजारी, विद्यानगर, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड येथे वास्तव्यास आहेत. कै. दिनेश रविंद्र गंगावणे हे महावितरण अलिबाग विभाग अंतर्गत अलिबाग उपविभाग-२, ता. अलिबाग, जि. रायगड येथील कार्यालयात 'सहाय्यक अभियंता' या पदावर नोकरीस होते. ते नोकरीत असताना दि.३०/१२/२०२५ रोजी त्यांचे हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले. अर्जदार या त्यांस एकमेव वारस आहेत.

मयत कै. दिनेश रविंद्र गंगावणे हे महावितरण अलिबाग विभाग अंतर्गत अलिबाग उपविभाग-२, ता. अलिबाग, जि. रायगड येथील कार्यालयात 'सहाय्यक अभियंता' या पदावर नोकरीस होते. त्यामुळे शासकीय धोरणाप्रमाणे मयताचे वारसास अनुकंपा तत्वावर त्यांची पत्नी अर्जदार असल्यामुळे पात्र आहेत. तशी मागणी यातील अर्जदार यांनी महावितरण अलिबाग विभाग अंतर्गत अलिबाग उपविभाग-२, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडे केली असता महावितरण अलिबाग विभाग अंतर्गत अलिबाग उपविभाग-२, ता. अलिबाग, जि. रायगड या कार्यालयाने अर्जदार यांचे अनुकंपा तत्वावरील नोकरीसाठी वरिष्ठ कार्यालयात प्रस्ताव दाखल करणेसाठी वारस दाखल्याची मागणी केली. तसेच अर्जदार यांनी प्रॉव्हिडंट फंड व फॅमिली पेन्शनसाठी मागणी केली असता प्रॉव्हिडंट फंड व पेन्शनचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयात दाखल करणेसाठी मयताचे वारस असले बाबतचे मे. न्यायालयाचे वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे.

आणि ज्याअर्थी, सदर अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणासही कसल्याही प्रकारचे म्हणणे वा हरकत दाखल करण्याची असल्यास अशा लोकांनी दि.१८/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता न्यायालयात स्वत: अगर त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधीमार्फत हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे. दि.१८/११/२०२६ रोजी अगर तत्पूर्वी सदर वारस दाखला देणेबाबत अर्जास कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारास वारस दाखला देण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक २६ माहे ऑक्टोबर २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्याशिक्क्यानिशी दिले.

सही/-
लिपीक
दिवाणी न्यायालय क.स्तर
अलिबाग-रायगड

सही/-
अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर
अलिबाग-रायगड

अलिबागच्या विकासाचा 'अदृश्य' पाया मजबूत

■ भुयारी गटार योजनेला निर्णायक गती ■ शहराच्या सांडपाणी व्यवस्थापनाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड

| अलिबाग | प्रतिनिधी |

शहराचा विकास म्हटला की रस्ते, चौक, सुशोभीकरण, पाणीपुरवठा आणि अन्य दृश्यमान कामे डोळ्यासमोर येतात. मात्र, एखाद्या शहराचा शाश्वत विकास केवळ दिसणाऱ्या कामांवर अवलंबून नसतो; तर शहराच्या जमिनीखाली उभ्या राहणाऱ्या मूलभूत सुविधाही तितक्याच महत्त्वाच्या असतात. याच दृष्टीने अलिबागच्या विकासाचा 'अदृश्य पाया' मजबूत करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकण्यात आले आहे.



पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रकल्प

एसटीपीच्या माध्यमातून सांडपाण्यावर प्रक्रिया झाल्यामुळे त्याचे व्यवस्थापन अधिक शास्त्रोक्त पद्धतीने करता येणार असून, स्वच्छता आणि पर्यावरणाच्या दृष्टीनेही या प्रकल्पाचे महत्त्व आहे. त्यामुळे आज सुरू झालेले काम हे केवळ एका बांधकामाचा प्रारंभ नसून अलिबागच्या पुढील अनेक वर्षांच्या नागरी व्यवस्थेची क्षमता वाढविण्याच्या दिशेने टाकलेले पाऊल मानले जात आहे.

राज्य नगरोत्थान अभियान योजनेअंतर्गत सुरू असलेल्या अलिबाग नगर परिषदेच्या भुयारी गटार योजनेतील ४.५ एमएलडी क्षमतेच्या एसटीपीमधील SBR कामाचा शुभारंभ अलिबाग नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान वीज व बांधकाम समिती सभापती प्रशांत नाईक यांच्या हस्ते करण्यात आला. शहराचा विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता भविष्यात सांडपाणी व्यवस्थापन हा महत्त्वाचा नागरी प्रश्न ठरू शकतो. त्यामुळे समस्या निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा आत्तापासूनच आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यावर भर देण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी सन २०२४ मध्ये तब्बल ६१ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, योजनेचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. त्यातील ४.५ एमएलडी क्षमतेच्या एसटीपीमधील SBR कामाला सुरुवात झाल्याने प्रकल्पाच्या अंमलबजावणीतील आणखी एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सांडपाण्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करण्याची व्यवस्था या प्रकल्पातून उभी राहणार आहे. शहराला भविष्यातील पर्यटन, नागरीकरण, वाढत्या लोकसंख्येचा ताण सांभाळायचा असेल तर पायाभूत सुविधा आजच सक्षम करणे आवश्यक आहे. त्यासाठी केवळ शहराचा चेहरा बदलण्यापेक्षा शहराची अंतर्गत व्यवस्था मजबूत करण्यावर भर देणे गरजेचे आहे.

भुयारी गटार योजना ही याच व्यापक नियोजनातील महत्त्वाची कडी ठरणार आहे. नगर परिषदेच्या माध्यमातून शहरातील मूलभूत सुविधांच्या विकासाला गती देताना दृश्यमान विकासाबरोबरच जमिनीखालील पायाभूत सुविधांनाही प्राधान्य दिले जात आहे. भुयारी गटार योजनेचे काम पूर्णत्वास गेल्यानंतर शहरातील सांडपाणी व्यवस्थापन अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. या कामाच्याप्रसंगी नगर परिषदेचे मुख्याधिकारी सागर साळुंखे, अनिल चोपडा, ऋषिकेश माळी, सागर भगत, संतोष मुंढे निखिल पाटील, प्रदीप गुंजाळ उपस्थित होते.

कामोठेत निवडणूक आयोगाविरोधात पदयात्रा


| पनवेल | प्रतिनिधी |

भारतीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमारांच्या कार्यपद्धती विरोधात तसेच व्होट चोरीच्या निषेधार्थ आयोजित निषेध पदयात्रा कामोठे येथे काढण्यात आली. पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने निवडणूक आयोगाविरोधात व्होट चोरीच्या निषेधार्थ आयोजित पदयात्रेचे आयोजन कामोठे शहर काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष शैलेश पाटणे यांनी केले होते. या पदयात्रेद्वारे कथित व्होट चोरीच्या मुद्द्यावर निषेध व्यक्त करून लोकशाही आणि मतदानाच्या अधिकाराच्या संरक्षणाची मागणी करण्यात आली. या पदयात्रेस सुदाम पाटील, डॉ. श्रुती म्हात्रे, जयवंत देशमुख, चेतन म्हात्रे, प्रदीप सुंनके, बबन केणी, राकेश जाधव आणि शंभू म्हात्रे, अक्षय गायकर, रुपाली बरेटो, सतीश कांबळे,आदी सहभागी झाले होते.

गर्दीच्या ठिकाणी फटाके विक्रीस बंदी

| रोहा | प्रतिनिधी |

दिवाळीत फटाके विक्रीसाठी बाजारपेठेत रहदारी अथवा गर्दीच्या ठिकाणी व्यापारी बांधवांकडून फटाके विक्रीचे छोटे कापडी स्टॉल उभे केले जातात. गर्दीच्या ठिकाणी घातक फटाके विक्री होत असताना एखादी अप्रिय घटना घडून जीवित व वित्तहानी होऊ नये या विषयी खबरदारीचा उपाय म्हणून रोहे बाजार पेठेतील गर्दी व रहदारीच्या ठिकाणी फटाके विक्रीस बंदी घातली आहे. तर यंदा स्टॉल धारकांना बायपास रोड वरील नदी संवर्धन गार्डन मैदानात पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या ठिकाणी शासनाची परवानगी असलेले फटाके नगर पालिके कडून रीतसर परवानगी घेऊनच विक्री करावे असे आवाहन नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांनी केले आहे. दिवाळीनिमित्ताने बाजारात फटाके स्टॉल व कायदेशीर फटाके विक्रीच्या अनुषंगाने विशेष बैठक पार पडली. यावेळी नगराध्यक्षा वनश्री शेडगे, उप नगराध्यक्ष अहमद दर्जी, मयुर दिवेकर, राजेंद्र जैन, महेश कोलटकर, रविंद्र चाळके, नीता हजारे, महेंद्र गुजर, अजित मोरे, अरबाज मनेर, प्रेषित बारटक्के, मनोज पुळेकर व स्टॉलधारक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कालवा सुरू करण्याची मागणी

पाताळगंगा: गेल्या बारा वर्षांपासून बंद असलेला कालवा पुन्हा सुरू करून शेतीसाठी पाणी उपलब्ध करून द्यावे, या मागणीसाठी ग्रुप ग्रामपंचायत माजगाव आणि ग्रामस्थांच्या वतीने पाटबंधारे विभागाचे अधिकारी भगवान कदम यांना निवेदन देण्यात आले. कालव्याचे पाणी लवकरात लवकर उपलब्ध झाल्यास परिसरातील शेतीला नवसंजीवनी मिळणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

शेतात पाणी नसल्याने शेतकरी चिंतातुर

| पाली/ वाघोशी | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यात भात पिकाला शेवटच्या टप्प्यात अत्यंत आवश्यक असलेल्या पावसाने दडी मारल्याने बळीराजा संकटात सापडला आहे. सध्या शेतात भाताच्या लोंब्या पूर्णपणे बाहेर आल्या आहेत; मात्र जमिनीत अजिबात पाणी नसल्याने पिकून हातात येणारे पीक सुकण्याची भीती निर्माण झाली आहे.



ऐन मोक्याच्या वेळीच पाण्याचा तुटवडा निर्माण झाल्याने उत्पादनात ५० ते ६० टक्क्यांपर्यंत घट होण्याची शक्यता आहे. शेतात जिथे पाणी नाही त्या ठिकाणी भाताला लोंबल्याच आलेल्या नाहीत.

दरवर्षी शेतात जास्त पाणी साचून राहिल्यामुळे उंदीर व गुरे आदी प्राण्यांच्यामुत्रामुळेलेप्टोस्पायरोसिस होण्याचा मोठा धोका असतो. परंतु, यंदा शेतात अजिबात पाणी साचलेले नसल्यामुळे लेप्टोस्पायरोसिसचा धोका टळला आहे. हा एकमेव दिलासा असला, तरी पाण्याच्या अभावामुळे भाताचे दाणे नीट न पोसल्यास हातात आलेले पीक वाया जाण्याची भीती आहे. हातातोंडाशी आलेला घास निसटून जात असल्याने शासनाने तातडीने आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

शिरढोणमध्ये दुर्बिणीतून अवकाश निरीक्षण

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

कोजागिरी पौर्णिमा अर्थात शरद पौर्णिमेचे औचित्य साधून शिरढोण येथे आयोजित करण्यात आलेल्या आकाशदर्शन कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दुर्बिणीच्या माध्यमातून चंद्र आणि शनी ग्रहाचे दर्शन घेण्याची संधी यावेळी ६८ जणांनी अनुभवली. विद्यार्थी, पालक आणि विज्ञानप्रेमींनी या उपक्रमात सहभाग घेत अवकाश निरीक्षणाचा आनंद लुटला.



या कार्यक्रमादरम्यान केवळ दुर्बिणीतून ग्रहांचे दर्शन घडविण्यापुरते मर्यादित न राहता, आकाश निरीक्षणाच्या विविध पद्धतींचीही माहिती देण्यात आली. उघड्या डोळ्यांनी आकाशाचे निरीक्षण कसे करावे, दुर्बिणीचा वापर करून ग्रह-ताऱ्यांचे निरीक्षण कसे करावे, तसेच बायनॉक्युलरच्या साहाय्याने आकाशदर्शन करताना कोणती काळजी घ्यावी, याबाबत सहभागी व्यक्तींना तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमातील प्रश्नोत्तरांच्या सत्राला विद्यार्थ्यांसह पालकांनी चांगला प्रतिसाद दिला. विज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन, अवकाश निरीक्षण आणि विज्ञान क्षेत्रातील नव्या घडामोडींविषयी उपस्थितांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जिज्ञासा निर्माण करणे हा होता.

जयंत पाटील यांच्याकडून गांगल कुटुंबाचे सांत्वन

| चणेरा | प्रतिनिधी |

शेतकरी कामगार पक्षाचे रोहा येथील निष्ठावंत कार्यकर्ते संजय गांगल यांच्या निधनाने शेकापच्या कार्यकर्त्यांमध्ये शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनामुळे पक्षाने एक निष्ठावंत कार्यकर्ता गमावल्याची भावना व्यक्त करण्यात आली. या दुःखद प्रसंगी भारतीय शेकापचे सरचिटणीस भाई जयंत पाटील यांनी रोहा येथील गांगल यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले.



गांगल हे रोहा परिसरातील शेकापचे प्रमुख ज्येष्ठ कार्यकर्ते म्हणून परिचित होते. पक्षाच्या विचारधारेशी एकनिष्ठ राहून त्यांनी संघटनेच्या कार्यात योगदान दिले होते. त्यांच्या निधनाने पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये हळहळ व्यक्त केली. यावेळी त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. गांगल यांनी पक्षाच्या विचारधारेशी एकनिष्ठ अनेक चळवलीत योगदान दिले होते.

यावेळी कमळाकर वाघमोडे, आरडीसीसी संचालक गणेश मढवी, जिल्हा चिटणीस सदस्य तुकाराम खांडेकर, हरीचंद्र खांडेकर, तालुका चिटणीस शिवराम महाबळे, आरे सरपंच राजेंद्र मळेकर, राजू तेलगे, अजगर सय्यद, तुकाराम शिंदे, विनायक धामणे, प्रविण जांभेकर यांच्यासह तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी गांगल कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांना या कठीण प्रसंगी धीर दिला.

कर्मचाऱ्यांच्या वर्तनची चौकशीची मागणी | **शुल्क आकारण्यामागील कारणे स्पष्ट करावीत**

खारपाडा टोल नाक्यावर टोलवसुली?

| माणगाव | प्रतिनिधी |

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी महत्त्वाचा असलेल्या खारपाडा टोल प्लाझावरील टोलवसुलीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. महाराष्ट्र शासनाने टोलवसुली बंद केल्याचे सांगितले जात असताना, वाहनचालकांकडून अद्याप शुल्क आकारले जात असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरदचंद्र पवार गटाचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष साज्जाद दावरे यांनी केला आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.



पक्षाच्या बैठकीसाठी मुंबईला जात असताना साज्जादभाई दावरे यांना खारपाडा टोल नाक्यावर शुल्क भरण्यास सांगण्यात आले. त्यानंतर त्यांनी टोलवसुलीबाबत संबंधित कर्मचाऱ्यांकडे विचारणा केली. यावेळी जयेश नामक कर्मचाऱ्याने कथितरीत्या उद्धटपणे उत्तर दिल्याचा आरोप दावरे यांनी केला. कोणत्याही व्हीआयपीला टोलमधून सूट नसून सर्वांकडून शुल्क आकारले जाते, असे संबंधित कर्मचाऱ्याने सांगितल्याचेही त्यांनी नमूद केले.

या शासनाच्या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत आहे की नाही, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. टोलवसुली बंद करण्याचा निर्णय झाल्याचे सांगितले जात असेल, तर त्यानंतरही वाहनचालकांकडून पैसे का घेतले जात आहेत? संबंधित टोल प्रशासनाला शासनाच्या निर्णयाबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत का? असे प्रश्न दावरे यांनी उपस्थित केले आहेत. टोलवसुलीच्या निर्णयाबाबत संभ्रम कायम राहिल्यास त्याचा थेट आर्थिक भार सर्वसामान्य वाहनचालकांवर पडू शकतो. त्यामुळे संबंधित प्रशासनाने केवळ तोंडी स्पष्टीकरण न देता शासनाच्या आदेशाची स्थिती, टोलवसुलीचे अधिकृत नियम आणि शुल्क आकारण्यामागील कारणे स्पष्ट करावीत, अशी मागणी दावरे यांनी केली आहे. टोल नाक्यावरील कर्मचाऱ्यांच्या कथित अरेरावीच्या वर्तनाचीही चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, असे त्यांनी म्हटले आहे.

दरम्यान, टोलवसुली बंद करण्याच्या निर्णयानंतर ती पुन्हा सुरू करण्याबाबत कोणतीही अधिकृत माहिती आपल्या निदर्शनास आलेली नसल्याचे दावरे यांनी सांगितले आहे.

खारपाडा टोल प्लाझावरील टोलवसुलीबाबत शासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करावी. निर्णयानंतरही अनधिकृतपणे शुल्क आकारले जात असल्याचे आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी दावरे यांनी केली.

कोजागिरी पौर्णिमेनिमित्त अलिबागमध्ये रंगला 'महागरबा'


(छायाचित्र : समीर मालोदे)

















जंगलांचे कत्तलखोर

आधी आरे, नंतर गडचिरोली आणि आता रायगड जिल्ह्यातील कर्जत. शिवाय अध्येमध्ये शक्तीपीठ, पालघर आणि तिसऱ्या मुंबईचे प्रकल्प आहेतच. देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने महाराष्ट्रातल्या उरल्यासुरल्या जंगलांची, झाडझाडोऱ्याची कत्तल करायचा चंग बांधला आहे. आरेमध्ये मेट्रो प्रकल्पातील कारशेडसाठी आवश्यक आहे म्हणून रातोरात हजारो झाडे कापण्यात आली. नंतर गडचिरोलीमध्ये खाण प्रकल्पांसाठी कुऱ्हाडी चालवण्यात आल्या. आता कर्जतमध्ये किमान ४८ हजार झाडे कापली जाणार आहेत. हा अधिकृत आकडा असला तरी अनधिकृतरीत्या किती प्रकारची झाडे तोडली जातील याला काही गणती नाही. आणि, या प्रत्येक ठिकाणी आक्षेप घेणाऱ्यांना महाराष्ट्रद्रोही ठरवले जाणे हेही समान आहे. शिवाय, मूळ आक्षेपांना उत्तरे न देता गाडी भलत्याच मुद्द्यांवर घेऊन जाणे हेही समान आहे. उदाहरणार्थ, कर्जतमध्ये टोरेंट कंपनीच्या वीज प्रकल्पांसाठी झाडतोड चालू आहे. मुळात हा प्रकल्प आवश्यक आहे का, शिवाय त्यात होणारा खर्च आणि जंगलांचा ऱ्हास याबद्दल प्रश्न विचारले जात असताना मुख्यमंत्री पनवेलमध्ये काल काय सांगत होते तर या प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या विजेवर पहिला हक्क महाराष्ट्राचाच असेल. दुसरे म्हणजे या प्रकल्पाच्या बदल्यात टोरेंट कंपनीने सरकारला २५३ हेक्टर जमीन दिली आहे असेही फडणवीस म्हणाले. ही जमीन नेमकी कोठे आहे, कोणत्या दर्जाची आहे आणि तिचा भविष्यात काय उपयोग होणार आहे हेही सरकारने जाहीर करायला हवे. कर्जतमध्ये जी झाडे तुटणार आहेत त्या बदल्यात टोरेंट कंपनी ६० हजार आणि सरकारचे वन खाते ३० हजार झाडे लावणार असल्याचेही फडणवीस म्हणाले. आरे किंवा अन्य ठिकाणीही असेच दावे सरकारने केले. पण आरेच्या ऐवजी नव्याने लावलेल्या झाडांपैकी ५० टक्केही जगली नाहीत असा अनुभव आहे. याचे ऑडिट सरकार कधी करत नाही वा आता जेवढ्या त्वेषाने ते विरोधकांवर तुटून पडतात तेवढ्या जोशाने ही लावलेली झाडे नेऊन दाखवत नाहीत. मोठमोठे आकडे सांगितले की काम झाले असा या सरकारचा समज आहे. यापूर्वीही राज्यात दोन कोटी झाडे लावण्याचा संकल्प झाला होता. त्याचे काय झाले हे सर्वांसमोर आहे.

आकड्यांची दडपादडपी

सध्या जी जंगलतोड चालू आहे ती भीमाशंकर अभयारण्यापासून १५ किलोमीटर दूर आहे असेही सरकार सांगते. पण अभयारण्यापासून दूर असली म्हणजे झाडे तोडावीत अशी काही सूट मिळते का असा प्रश्न आहे. शिवाय, सध्याचे क्षेत्र माथेरानच्या इकोसेन्सिटिव्ह झोनपासून जवळच असून एकूण झाडतोडीचा अतिशय गंभीर परिणाम या परिसरावर होणार आहे. सरकारने कर्जत शहरापासून १५ ते ३० किलोमीटरच्या परिसरात पाच धरण प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. याचा पर्यारणावर काय परिणाम होईल याचा एकत्रित अहवाल प्रसिध्द करून त्याबाबत जनसुनावणी घेणे व जनतेला आश्वस्त करणे ही सरकारची जबाबदारी होती. पण इथे सगळाच मामला दडपादडपीचा आहे. साईडोंगर इथे गुजरातची टोरेंट कंपनी तीन हजार मेगावॅट वीजनिर्मितीचा प्रकल्प उभारत आहे. कोयना धरणातून महाराष्ट्राच्या एकूण गरजेच्या आठ टक्के वीजनिर्मिती होते. तरीही तिथली क्षमता १९६० मेगावॅट इतकी आहे. त्याहून जवळपास दीडपट असा हा मोठा प्रकल्प आहे. शिवाय हा एकच असा प्रकल्प नाही. सह्याद्रीच्या खोऱ्यामध्ये मुंबईपासून ते खाली कोल्हापूरपर्यंत असे असंख्य प्रकल्प राबवले जायचे आहेत. साईडोंगर प्रकल्पासाठी ३७७ हेक्टर जमीन लागणार असून २३३ हेक्टर ही सरळसरळ जंगलाची जमीन आहे. याची रीतीने इतरत्र हजारो हेक्टरवरची झाडे नष्ट होणार आहेत. पंप स्टोरेज प्रकल्पात सह्याद्रीच्या तळाला नदीचे पाणी अडवून साठवायचे आणि नंतर ते वर डोंगरावर नेऊन त्यातून जलविद्युत तयार करायची अशी कल्पना आहे. एरवी पावसाळ्यात पूर येतो तेव्हा हे पाणी वाहून जाते असे दाखवले जाते. पण शिवाय यात कोळसा जाळला जात नसल्याने त्यात प्रदूषण होत नाही असा दावा केला जातो. मुख्यमंत्र्यांनी काल ते सांगितले. एरवी तीन हजार मेगावॅट कोळसा प्रकल्पातून होणारे प्रदूषण रोखण्यासाठी कोट्यवधी झाडे लागतील असा उलटा हिशेबही त्यांनी मांडून दाखवला.

हे होऊ देता कामा नये

फडणवीससाहेब वकील आहेत व ते उपलब्ध माहिती कशीही उलटसुलट फिरवू शकतात. हा प्रकल्प काँग्रेसने केला असता व ते विरोधी पक्षात असते तर झाडे कशी तुटणार आहेत व त्या प्रदूषणाचे किती भयंकर परिणाम होणार आहेत हे त्यांनी सांगितले असते. मुद्दा असा की, पंप स्टोरेज प्रकल्पात कोळसा जाळला जात नसला तरी खालचे पाणी लिफ्ट करून वर चढवण्यासाठी भरपूर उर्जा खर्च होत असते. ही उर्जा आकाशातून आपोआप पडणार नाही. तिच्यासाठी वीज निर्माण करावी लागेल किंवा बॅटरीच्या तयार करावी लागेल. या बॅटरीसाठीही उर्जा लागते व त्यातही भरपूर प्रदूषण होत असते. शिवाय याची किंमत व लाभाचा हिशेब नीट मांडायला हवा. यासाठी खाली किती झाडे तुटणार व त्याचा पर्यावरणावर काय परिणाम होणार हे झाकून ठेवण्याचा परिणाम होतो. दुसरे म्हणजे पाणी साठवून ठेवल्यामुळे हजारो लोक विस्थापित होणार आहेत. शेती बुडणार आहे. शिवाय हे सर्व नक्की वीजनिर्मितीसाठी आहे की त्यामागे आणखी वेगळेच हेतू आहेत अशीही शंका आहे. सध्या नवी मुंबई परिसरात प्रचंड डेटा सेंटर्स उभी राहणार आहेत. त्यासाठी तितकेच प्रचंड पाणी लागते. शिवाय कालच मुख्यमंत्र्यांनी तिसऱ्या मुंबईचा शिलान्यास केला. त्यामुळे पनवेलपासून पुढच्या परिसरात विक्राळ गतीने वस्ती वाढणार आहे. या सर्वांसाठी लागणारे पाणी कर्जत परिसरातून खेचले जाईल असे स्पष्टपणे दिसत आहे. खुद्द कर्जतजवळ कोंढाणे, पोश्री, शिलार इथे धरणे होणार आहेत. कोंढाणे प्रकल्पाला १५ वर्षांपूर्वी विरोध झाल्याने ते थांबले होते. पण आता तेव्हाचे विरोधकच सत्तेत आहेत आणि तेव्हाचे सत्ताधीश आता त्यांना जाऊन मिळालेले आहेत. त्यामुळे या प्रकल्पाला कोणी अडवणारे नाही असा सरकारचा समजा झाला आहे. पण हा सगळा विकास आपल्या मुळावर उठणारा आहे हे जनतेला आता कळून चुकले आहे. त्यामुळे जनताच उठाव करून त्यांना हाणून पाडेल यात शंका नाही. कर्जत प्रकल्पातील टोरेंट ही अत्यंत वादग्रस्त कंपनी आहे. तिच्या अनेक प्रकल्पांना नेहमीच विरोध झाला आहे. भिवंडी, आग्रा अशा ठिकाणी वीजवितरण करण्याचे कंत्राट तिने मिळवले. स्थानिकांची नाराजी असूनही हे काम तिला दिले गेले. टोरेंटप्रमाणेच इतरत्र अशाच वादग्रस्त कंपन्यांची कामे चालू आहेत. पुणे जिल्ह्यातील मावळ पट्ट्यात त्यांना विरोध होतो आहे. हा सर्व विरोध एकत्र जोडला जायला हवा. सरकारचे भरमसाठ दावे खोडून काढले जायला हवेत. एकेक झाड, एकेक गाव आणि एकेक वस्ती वाचवली जायला हवी. डेटा सेंटर किंवा अदानीसारख्या कंपन्यांच्या तात्पुरत्या फायद्यांसाठी सध्या जंगलांवर आणि घरादारांवर बिनदिक्कत बुलडोझर चालवला जात आहे. हे होऊ देता कामा नये.

विचार

इराकमधील अमेरिकी हस्तक्षेपाच्या पर्वाची अखेर

इराकमधून अमेरिकेच्या अखेरच्या सैनिकांची माघार हा केवळ एका लष्करी मोहिमेचा शेवट नाही, तर एका प्रदीर्घ पर्वाचा समारोप आहे. या माघारीमुळे इराकच्या सार्वभौमत्वाला नवा अवकाश मिळाला असला, तरी इराणसमर्थक सशस्त्र गट, 'इसिस'च्या सुप्त पेशी आणि हवाई संरक्षणातील पोकळी यांसारखी आव्हानेही उभी राहिली आहेत. त्यामुळे ही माघार मध्यपूर्वेतील शक्तीसमीकरणाच्या नव्या पर्वाची सुरुवात आहे.

प्रा. जयसिंग यादव

अमेरिकेच्या नेतृत्वाखालील सैन्याने २००३ मध्ये इराकवर आक्रमण केले आणि सद्दाम हुसेनची सत्ता उलथवून टाकली. त्यानंतर इराकच्या राजकारणात, सुरक्षाव्यवस्थेत आणि अर्थव्यवस्थेत अमेरिकेचा मोठा प्रभाव निर्माण झाला. युद्ध, बंडखोरी, दहशतवाद आणि सांप्रदायिक हिंसाचाराच्या प्रदीर्घ काळातून इराकला जावे लागले. अमेरिकेने २०११ मध्ये आपले लढाऊ सैनिक इराकमधून माघारी घेतले. त्यामुळे अमेरिकेची लष्करी भूमिका संपल्याचे चित्र निर्माण झाले; परंतु हा शेवट ठरला नाही. २०१४ मध्ये 'इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड सीरिया'ने मोठ्या भूभागावर कब्जा मिळवला. 'मोसूल'सारख्या महत्त्वाच्या शहरावर 'इसिस'ने नियंत्रण मिळवले आणि इराकच्या सुरक्षा व्यवस्थेसमोर मोठे संकट उभे राहिले. त्यानंतर इराकी सरकारच्या विनंतीवरून अमेरिकेच्या नेतृत्वाखालील आंतरराष्ट्रीय आघाडी पुन्हा इराकमध्ये दाखल झाली. 'इसिस'चे संघटित लष्करी सामर्थ्य २०१९ पर्यंत मोठ्या प्रमाणात मोडून काढण्यात आले, तरीही अमेरिकन सैन्याची उपस्थिती कायम राहिली. अखेर २०२४ मध्ये अमेरिका आणि इराकमध्ये झालेल्या करारानुसार इराकमधील आंतरराष्ट्रीय आघाडीचे अभियान टप्प्याटप्प्याने संपवण्याचा निर्णय झाला आणि ३० सप्टेंबर ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली. आता ती माघार पूर्ण झाली आहे. माघार म्हणजे संबंधांचा अंत नव्हे. अमेरिकन सैनिक इराकमधून बाहेर पडले असले, तरी अमेरिका आणि इराकचे संबंध संपलेले नाहीत. लष्करी मोहिमेऐवजी प्रशिक्षण, गुप्तचर सहकार्य आणि द्विपक्षीय सुरक्षा संबंधांचा नवा टप्पा सुरू राहणार आहे.

दरम्यान, 'इसिस'विरोधी आघाडीचे मुख्यालय जॉर्डनमध्ये हलवण्यात आले आहे. ही बाब महत्त्वाची आहे. कारण मध्यपूर्वेत अमेरिकेची भूमिका एका दिवसात नाहीशी होणार नाही. इराकमधील सैन्य माघारी घेणे आणि या प्रदेशातून अमेरिकेचा प्रभाव पूर्णपणे संपणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. अमेरिकेचे आर्थिक, राजनैतिक आणि सुरक्षा संबंध कायम आहेत. इराकच्या तेल उत्पन्नाशी संबंधित आर्थिक व्यवस्थेतही अमेरिकेचा प्रभाव अद्याप महत्त्वाचा आहे. त्यामुळे 'अमेरिका इराकमधून निघून गेली' याचा अर्थ 'अमेरिका इराकमधून पूर्णपणे बाहेर पडली' असा घेणे चुकीचे ठरेल. अमेरिकेच्या माघारीचा सर्वाधिक भूराजकीय परिणाम इराणच्या भूमिकेवर होणार आहे. इराक हा भौगोलिकदृष्ट्या इराणचा शेजारी आणि राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा देश आहे. इराकमध्ये इराणशी जवळीक असलेल्या राजकीय शक्ती आणि सशस्त्र गटांचे अस्तित्व आधीपासून आहे. अमेरिकन सैन्याच्या उपस्थितीमुळे या गटांच्या प्रभावावर एक प्रकारची मर्यादा होती. आता ती मर्यादा कमी झाल्याने इराणसमर्थक गटांना अधिक राजकीय आणि सुरक्षा अवकाश मिळू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. इराणने अमेरिकेच्या माघारीचे स्वागत केले असून इराणशी संबंधित सशस्त्र गटांनीही याकडे आपला विजय म्हणून पाहिले आहे; पण याचा अर्थ इराक आपोआप इराणच्या प्रभावाखाली जाईल, असा निष्कर्ष काढणेही घाईचे ठरेल. इराकचे स्वतःचे राष्ट्रीय हित, अरब जगतातील स्थान आणि अमेरिकेशी असलेले संबंध यांचा विचार बगदादला करावा लागेल.

इराकसमोरील खरी कसोटी म्हणजे परकीय प्रभावांमध्ये संतुलन राखून स्वतःचे सार्वभौम निर्णय घेण्याची क्षमता निर्माण करणे. इराकमध्ये विविध सशस्त्र गट अस्तित्वात आहेत. त्यापैकी काहींना इराणचा पाठिंबा असल्याचे मानले जाते. इराकी सरकारने या सशस्त्र गटांना राज्याच्या नियंत्रणाखाली आणण्याचे प्रयत्न केले आहेत; परंतु प्रभावशाली गटांनी शस्त्रे सोडण्यास विरोध केला आहे. काही गटांनी शस्त्रसमर्पणासाठी अशा अटी मांडल्या आहेत, की त्यांची अंमलबजावणी करणे इराकसाठी कठीण ठरू शकते. लोकशाही व्यवस्थेत अंतिम सुरक्षा अधिकार राज्याकडे असणे आवश्यक असते. एखाद्या देशात अनेक सशस्त्र शक्तीकेंद्रे निर्माण झाली, तर सरकारची सार्वभौमता कमकुवत होऊ शकते. त्यामुळे अमेरिकेच्या माघारीनंतर इराकसमोरील सर्वात मोठ्या अंतर्गत आव्हानांपैकी एक म्हणजे या सशस्त्र गटांना राज्याच्या सुरक्षा व्यवस्थेत कितपत समाविष्ट करता येते किंवा त्यांच्यावर कायदेशीर नियंत्रण कसे आणता येते, हा आहे. हा प्रश्न केवळ इराकचा अंतर्गत प्रश्न नाही. त्याचा परिणाम संपूर्ण मध्यपूर्वेच्या स्थैर्यावर होऊ शकतो. 'इसिस'चे पूर्वीचे संघटित राज्य आणि मोठ्या भूभागावरील नियंत्रण संपले असले, तरी दहशतवादी संघटनांच्या सुप्त पेशी आणि विखुरलेले सदस्य अजूनही धोका निर्माण करू शकतात. अमेरिकेच्या सैन्याने इराकी सुरक्षा दलांना प्रशिक्षण, गुप्तचर माहिती, हवाई मदत आणि लॉजिस्टिक क्षमता उपलब्ध करून दिली होती. आता प्राथमिक जबाबदारी इराकी सुरक्षा दलांवर आली आहे.

अमेरिकेने येथे यापुढे लष्करी स्वरूपातील प्रशिक्षण आणि गुप्तचर सहकार्य सुरू ठेवण्याचे संकेत दिले आहेत; मात्र प्रत्यक्ष सुरक्षा कारवाईचे नेतृत्व इराकलाच करावे लागणार आहे. २०१४ चा अनुभव इराकसाठी महत्त्वाचा धडा आहे. सुरक्षा यंत्रणा कमकुवत झाली, राजकीय मतभेद वाढले किंवा विविध भागांमध्ये शासनाचा प्रभाव कमी झाला, तर दहशतवादी संघटनांना पुन्हा डोके वर काढण्याची संधी मिळू शकते. म्हणूनच अमेरिकन सैन्याची माघार आणि 'इसिस'विरोधी लढ्याचा शेवट हे समानार्थी शब्द नाहीत. इराकसमोरील आणखी एक महत्त्वाचे आव्हान म्हणजे हवाई संरक्षण. विशेषतः कुर्दिस्तान प्रदेशात अमेरिकन सुरक्षा उपस्थिती आणि हवाई संरक्षण क्षमतांना महत्त्व होते. अमेरिकन सैन्य आणि त्याच्याशी संबंधित संरक्षण व्यवस्था हटवल्यानंतर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांच्या हल्ल्यांपासून संरक्षण करण्यासाठी इराकला स्वतःची क्षमता वाढवावी लागणार आहे. कुर्दिश भागातील अधिकाऱ्यांनी या बदलाबद्दल चिंता व्यक्त केली आहे. सध्याच्या अमेरिका-इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर हा मुद्दा आणखी संवेदनशील झाला आहे. इराकची जमीन कोणत्याही बाह्य संघर्षाचे रणांगण बनू नये, ही बगदादसमोरील मोठी जबाबदारी आहे. २००३ मध्ये सुरू झालेल्या युद्धाने इराकच्या राजकीय व्यवस्थेची दिशा बदलली. सद्दामची हुकूमशाही संपली; पण त्यानंतर देशाला दीर्घकाळ अस्थिरता आणि हिंसाचाराचा सामना करावा लागला. अमेरिकेलाही मोठी मानवी आणि आर्थिक किंमत मोजावी लागली. दोन दशकांहून अधिक काळाच्या संघर्षात सुमारे साडेचार हजार अमेरिकन सैनिकांचा मृत्यू झाला.

इराकी समाजासाठी या युद्धाची किंमत आणखी व्यापक होती. लाखो लोकांच्या जीवनावर त्याचा परिणाम झाला. पायाभूत सुविधांचे नुकसान, विस्थापन, सांप्रदायिक संघर्ष आणि राजकीय अस्थिरता यामुळे इराकच्या विकासाला मोठा धक्का बसला. त्यामुळे आज अमेरिकन सैन्य माघारी जात असताना इराकी समाजात आनंद आणि चिंता दोन्ही भावना दिसत आहेत. काहींसाठी ही परकीय लष्करी उपस्थिती संपल्याची घटना आहे, तर काहींना सुरक्षा पोकळी निर्माण होण्याची भीती आहे. इराकमधून माघार ही मध्यपूर्वेतील व्यापक बदलांच्या संदर्भात पहावी लागेल. अमेरिका या प्रदेशात आपली लष्करी भूमिका कमी करत असताना अनेक अरब देश स्वतःच्या सुरक्षेसाठी नवे राजनैतिक आणि प्रादेशिक पर्याय शोधत आहेत. सौदी अरेबिया, कतार, संयुक्त अरब अमिराती, तुर्की आणि इतर देशांच्या परराष्ट्र धोरणातही प्रादेशिक संबंधांना वाढते महत्त्व दिसत आहे. मध्यपूर्वेतील शक्तीसमीकरण आता केवळ अमेरिका विरुद्ध इराण या दोन ध्रुवांमध्ये राहिलेले नाही. तुर्की, सौदी अरेबिया, इस्रायल, इराण, कतार आणि इतर प्रादेशिक शक्ती स्वतःच्या हितानुसार भूमिका ठरवत आहेत. या बदलत्या समीकरणात इराकला महत्त्वाचे स्थान आहे. इराणचा शेजारी असूनही तो अरब जगाचा भाग आहे. अमेरिकेशी संबंध असूनही त्याच्या राजकारणात इराणचा प्रभाव आहे. त्यामुळे इराकला दोन्ही बाजूंमध्ये संतुलन साधावे लागणार आहे. अमेरिका गेल्यानंतर इराणचा प्रभाव वाढला तर इराकने एका परकीय प्रभावातून दुसऱ्या प्रभावाकडे जाण्याची वेळ येऊ नये. परकीय सैन्याची अनुपस्थिती म्हणजेच पूर्ण सार्वभौमत्व नव्हे. देशाची राजकीय व्यवस्था, सुरक्षा यंत्रणा, अर्थव्यवस्था आणि परराष्ट्र धोरण स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकतात, तेव्हा खरी सार्वभौमता तेव्हा निर्माण होते. त्यामुळे इराकसमोर दोन समान महत्त्वाची उद्दिष्टे आहेत. एकीकडे दहशतवाद आणि सशस्त्र गटांवर नियंत्रण ठेवणे आणि दुसरीकडे परकीय शक्तींच्या संघर्षात आपल्या भूमीचा वापर होऊ न देणे. ही प्रक्रिया सोपी नसेल; पण इराकने गेल्या दोन दशकांमध्ये परकीय शक्तींच्या संघर्षाची किंमत शेवटी सामान्य नागरिकांनाच मोजावी लागते, हा धडा घेतला आहे. अमेरिकेची इराकमधून माघार हा इतिहासाचा शेवट नाही. उलट, इराकच्या इतिहासातील एका नव्या अध्यायाची सुरुवात आहे. आता इराकसमोर स्वतःची सुरक्षा व्यवस्था सक्षम करण्याचे, सशस्त्र गटांना राज्याच्या चौकटीत आणण्याचे, 'इसिस'च्या अवशेषांना रोखण्याचे आणि बाह्य शक्तींच्या स्पर्धेपासून देशाला दूर ठेवण्याचे आव्हान आहे. अमेरिकेसाठीही हा बदल केवळ सैन्य मागे घेण्यापुरता मर्यादित नाही. मध्यपूर्वेतील आपली भूमिका कोणत्या स्वरूपात कायम ठेवायची, हा प्रश्न तिच्यासमोर आहे. इराणसाठी ही संधी असली, तरी तिचा वापर इराकच्या अंतर्गत राजकारणावर अतिरेकी प्रभाव निर्माण करण्यासाठी झाला, तर उलट प्रतिक्रिया निर्माण होण्याची शक्यता आहे. मध्यपूर्वेतील पुढचे समीकरण त्यामुळे केवळ अमेरिकेच्या अनुपस्थितीवर ठरणार नाही. इराक स्वतःची राज्यसंस्था किती मजबूत करतो, इराण किती प्रभाव टाकतो, अमेरिका किती अंतरावरून भूमिका बजावते आणि 'इसिस'सारख्या संघटनांना पुन्हा अवकाश मिळतो का, यावर त्याची दिशा ठरेल. इराकमधून अमेरिकन सैनिक गेले आहेत; पण अमेरिकेचा प्रभाव, इराणचे हितसंबंध आणि मध्यपूर्वेतील संघर्ष संपलेले नाहीत. आता परकीय सैन्याशिवाय स्वतःच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्याची कसोटी इराकपुढे आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

चर्चा आजची

सर्वसामान्य प्रवाशांचा विचार करावा

प्रमोद जाधव

एसटी महामंडळाकडून इंटरनेटच्या स्मार्ट सुविधांचा अभाव असल्याने रायगड जिल्ह्यातील असंख्य स्मार्ट कार्ड धारक प्रवासी स्मार्ट योजनेपासून वंचित राहत आहेत. कागद विरहीत व ऑनलाईन आर्थिक व्यवहार करण्यासाठी एसटी महामंडळाने सहा महिन्यापुर्वी स्मार्ट कार्ड (एनसीएमसी) योजना सुरु केली आहे. परंतु प्रवासात एनसीएमसी कार्ड वापरताना एसटीच्या तिकीट मशीनमध्ये बिघाड होणे, सर्व्हर डाऊन असणे आणि कार्ड सिंक न होणे अशा समस्या प्रवाशांना निर्माण होत आहेत. त्यामुळे प्रवाशांना आर्थिक भूर्दंड बसत आहे. एसटी महामंडळाचा उपक्रम कौतूकास्पद असला, तरी त्यासाठी लागणारी सुविधा उपलब्ध करण्यावर अधिक भर देणे गरजेचे आहे. सर्वसामान्यांचा विचार करावा अशी मागणी होत आहे.

एसटी महामंडळाने प्रवाशांसाठी स्मार्ट कार्ड प्रणाली २०१६ केली होती.परंतु तो प्रयत्न अपुराच राहिला. दोन वर्षात ही योजना फेल ठरली. आता एसटी महामंडळाने महिला व ज्येष्ठ नागरिक प्रवाशांसाठी(एनसीएमसी) स्मार्ट कार्ड देण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. रायगड जिल्ह्यात स्मार्ट कार्ड नोंदणीची प्रक्रीया मार्च महिन्यात सुरु केली. जिल्ह्यामध्ये एसटी बस आगारासह खासगी कार्यालयांमध्ये स्मार्टकार्डसाठी ४० हून अधिक सेंटर उभारण्यात आले आहेत. या सेंटरमध्ये कार्ड नोंदणीपासून कार्ड मिळविण्यासाठी कायमच गर्दी होत आहे.जिल्ह्यात आतापर्यंत एक लाख ३० हजार स्मार्ट (एनसीएमसी) कार्डची नोंदणी सवलतीने प्रवास करणाऱ्या महिला व जेष्ठ नागरिकांनी केलेली आहे.या स्मार्ट कार्डसाठी १९९ रुपये निश्चित केले आहे. कार्ड मिळाल्यानंतर त्यात डिजीटल पध्दतीने किंवा रोखीत देऊन रक्कम जमा करावी लागते. ज्यातून सवलतीचे तिकीट वजा केले जाते. जिल्ह्यात स्मार्ट कार्डद्वारे तिकीटाचे पैसे देऊन तिकीट घेण्याची पध्दत एसटी महामंडळामार्फत सुरू केली आहे. एसटीच्या कॅशलेस व्यवहाराचे प्रवासी वर्गाकडून स्वागत करण्यात आले आहे. स्मार्टकार्डने तिकीट काढण्यासाठी इंटरनेटची सुविधा अत्यावश्यक असते. जिल्ह्यातील



दक्षिण रायगडमधील ग्रामीण व दुर्गम भागात मोबाईल नेटवर्क विकसीत झालेले नाही. त्यामुळे या विभागातून प्रवास करणाऱ्या महिला, ज्येष्ठ नागरिकांना एसटीचे स्मार्ट कार्ड अडचणीचे ठरत आहे. ग्रामीण भागात एनसीएमसी कार्ड वापरताना एसटीच्या तिकीट मशीनमध्ये बिघाड होणे, सर्व्हर डाऊन असणे आणि कार्ड सिंक न होणे अशा समस्या निर्माण होत आहेत. याचा सर्वाधिक फटका जिल्ह्यातील ग्रामीण व आदिवासी भागातील प्रवाशांना बसत असून, त्यांना आर्थिक भुर्दंडासोबतच मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. एकीकडे तांत्रिक अडचणींमुळे प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे बोलले जात आहे, त्यामुळे या समस्येवर तोडगा काढण्यासाठी एसटी महामंडळ व संबंधित प्रशासन आगामी काळात नेमकी काय पावले उचलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

एसटी महामंडळाने स्मार्ट योजना सुरु करून खऱ्या अर्थाने डिजीटल कामाला गती दिली आहे. या उपक्रमाचे स्वागत केले जात आहे. मात्र एसटीतील वाहकांकडे देण्यात आलेल्या तिकीट मशीनमधील तांत्रिक बिघाडाचा प्रश्न सतत भेडसावत आहे. त्यामुळे स्मार्ट कार्डद्वारे सवलतीमधून प्रवास करताना प्रचंड त्रास होत आहे. एसटी महामंडळाने हा प्रश्न मार्गी लावे पर्यंत आधारकार्ड सवलतीसाठी ग्राह्य धरणे गरजेचे आहे, असे मत प्रवासी वर्गाकडून व्यक्त केले जात आहे. नेटवर्कची समस्या गंभीर आहे. मशीनमधील हाफ तिकीटचे ऑप्शनही काढले आहे. कार्ड लावल्यावर तो ऑप्शन येतो. परंतू तांत्रिक अडचणीमुळे कार्डद्वारे सवलत मिळत नाही. पावत्यांवर क्यूआर स्कॅन करून सवलत देता येते. परंतु त्याची प्रिंट योग्य नसल्याने सवलतीचा लाभ महिलांसह ज्येष्ठ नागरिकांना घेता येत नाही, असे मत रायगड एसटी प्रेमींकडून व्यक्त करण्यात आले आहे. प्रवाशांचे थेट पुर्ण तिकीट घेतले जात नाही. निश्चित स्थळ येईपर्यंत स्मार्टकार्डद्वारे सवलतीच्या दरात तिकीट देण्याचा प्रयत्न वाहकांद्वारे केला जातो, असे मत एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आले आहे. एसटी महामंडळाची एसटी बस खेडोपाड्या ज्या प्रमाणे गतीने जाते. त्यापध्दतीने एसटीचा कारभार अधिक वेगवान आणि कारभार पारदर्शक व्हावा, यासाठी एसटी महामंडळाने स्मार्ट कार्ड (एनसीएमसी) योजना सुरु केली आहे. मात्र स्मार्ट कार्ड असतानाही सर्व्हर डाऊनमुळे प्रवाशांना पूर्ण तिकीट काढावे लागत आहे. त्याचा नाहक त्रास महिला प्रवाशांसह ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या प्रमाणात आहे. कार्डमध्ये शिल्लक रक्कम असतानाही इंटरनेट, कार्ड सिंक न होणे अशा कारणांमुळे स्मार्टकार्डचा तांत्रिक खोडा डोकेदुखी बनत आहे. स्मार्ट कार्ड येऊनही प्रवासात काहीही सुधारणा झाल्या नाहीत. त्यामुळे प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असल्याचा मुद्दा समोर आला आहे.एसटी महामंडळाने स्मार्ट कार्ड द्वारे लागू केलेली सवलत कौतूकास्पद आणि डिजीटल स्वरुपाची आहे. परंतु सर्वसामान्यांचा हा डिजीटल प्रवास अधिक गतीमान होण्यावर भर देऊन सर्वसामान्य प्रवाशांचा विचार करण्याची गरज आहे.

लोकसंसद

विश्वविक्रमी शंखनाद !

प्रभू श्रीरामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या परमपवित्र नाशिक नगरीत सिंहस्थ कुंभपर्वाची सिद्धता जोमात सुरु असताना कोजागिरी पौर्णिमेच्या पावन दिनी नाशिक परिसर ५१७ जणांच्या सामूहिक शंखनादाने निनादून गेला. एकाच वेळी ३०३ जणांकडून शंखनाद करण्याचा अमेरिकेचा विक्रम मागे टाकत हा नवीन विश्वविक्रम प्रस्थापित करण्यात आला आहे. सनातन भारतीय संस्कृतीत शंखाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. समुद्र-मंथनात मिळालेल्या १४ रत्नांमध्ये शंख असल्यामुळे तो 'समुद्रतनय' म्हणून ओळखला जातो. देवपूजेत शंखातील पाणी ज्याला 'शंखोदक' म्हणतात, ते देवाच्या मूर्तीभोवती फिरवून भक्तांवर शिंपडले जाते. यामुळे भक्तांच्या मनात भगवंताविषयी प्रेम निर्माण होते. शंखातील पाणी ब्रह्महत्येसारख्या मोठ्या पापांनाही दूर करते, असे मानले जाते. म्हणूनच शंखोदकाला भगवान श्रीविष्णूंचे चरणामृत, पंचामृत, अर्पण केलेली तुळस आणि प्रसाद यांच्याइतकेच महत्व आहे. शंखात साक्षात भगवान श्रीविष्णु यांचा निवास असल्याचे म्हटले जाते म्हणूनच सदैव त्यांच्या हातात शंख धारण केलेला असतो. सणांच्या दिवशी तसेच कोणत्याही धार्मिक कार्यक्रमाच्या आरंभी शंखनाद केला जातो. शंखनादामुळे नकारात्मक ऊर्जा दूर होते. राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या अभूतपूर्व सोहळ्यात शंखनादाच्या निनादाने नाशिक परिसरात चैतन्यपूर्ण वातावरण निर्माण झाले. गोदावरीच्या तीरावर एकाच वेळी घुमलेल्या शंखध्वनीने नाशिकच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडवत सिंहस्थ कुंभमेळ्याच्या स्वागतासाठी नागरिकांमध्ये उत्साह आणि चैतन्य निर्माण केले आहे.

– जगन घाणेकर, घाटकोपर

दिनविशेष

रायगडातील पहिल्या शेतकरी संपाला सुरूवात

देशातला खोतीच्या विरोधातील शेतकऱ्यांचा पहिला संप हा रायगड जिल्ह्यातल्या अलिबाग तालुक्यातील चरी या गावात झाला. २७ ऑक्टोंबर १९३३ मध्ये सुरू झालेला हा संप तब्बल सात वर्षे चालला होता. पुढील सात वर्ष शेतजमीन बांधबंदिस्त करण्यात आली, असा हा चरीचा शेतकरी संप १४ वर्ष चालला होता. याच शेतकरी संपामुळे देशात कुळ कायदा लागू झाला. चरी येथील या शेतकऱ्याच्या संपामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सी.डी. देशमुख, मोरारजी देसाई यांचे पाय चरी गावाला लागले आहेत. नारायण नागू पाटील यांनी या संपाचे नेतृत्व करून शेतकऱ्यांची खोती विरोधात मोट बांधली होती.



कोकणातल्या खोतीच्या पद्धतीने कष्टकरी शेतकरी गांजला होता. कुळाने जमीन कसायची आणि त्यापैकी ७५ टक्के उत्पन्न खोताच्या घरी द्यायचं, अशी अनेक वर्षे ही अन्यायकारक पद्धत सुरू होती. रायगडमधील शेतकरी नेते नारायण नागू पाटील यांनी शेतकऱ्यांवर होणाऱ्या या अन्यायाला १९३३ साली वाचा फोडली. त्यांच्या नेतृत्वाखाली देशातील पहिला शेतकरी संप पुकारण्यात आला. नारायण नागू पाटील यांनी सर्व शेतकऱ्यांची एकजूट करून खोती विरोधात आवाज उठविला. खोती विरोधात शेतकऱ्यांनी संप पुकारला. संप हा टिकणारच नाही, अशी भावना सावकाराची होती. मात्र इरेला पेटलेल्या शेतकऱ्यांनी माघार घेतली नाही. शेतकऱ्याच्या घरची आर्थिक स्थिती खालावली. शेती व्यतिरिक्त काम करून मिळेल ते खाऊन शेतकऱ्यांनी संप यशस्वी केला. संप पुकारण्यात आल्यानंतर चरी, रायंदे, कोपरपाडा, कोलटेंभी कोपर या गावातील जमिनी खाऱ्या पाण्याने भिजून गेल्या होत्या. हा संप मिटविण्याचे प्रयत्न निष्फळ ठरले. चरीचा हा संप ऐतिहासिक ठरला.

शेतकऱ्यांच्या या लढ्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची साथ मिळाली. बाबासाहेब स्वतः चरीला आले आणि शेतकऱ्यांच्या भावना समजून घेतल्या. त्यावेळी झालेल्या केसेस लढण्यासाठी बाबासाहेब स्वतः शेतकऱ्यांच्या वतीने कोर्टात उभे राहिले. इंग्रज काळात इंग्रजांच्या जुलमी कायद्यासमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चरीच्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला.

त्याकाळी सात वर्षे काढलेल्या हालअपेष्टांमुळेमुळे आज चरीच्या गावकऱ्यांना अच्छे दिन आले, असे म्हणायला काहीच हरकत नाही. या लढ्यामुळे 'कसेल त्याची जमीन' हे धोरण अमलात आलं आणि 'कुळकायदा' तयार करण्यात आला. त्यामुळे खोत, सावकार आणि जमीनदारांच्या गुलामगिरीतून समस्त शेतकरीवर्ग मुक्त झाला. शेतकऱ्यांच्या या प्रदीर्घ लढ्याचे स्मारक चरी या गावात उभारण्यात आलेले आहे. या संपाची आठवण म्हणून शेतकऱ्यांचं अवजार असलेले टिकाऊ याचा वापर स्मारकस्तंभातील ज्योतीमध्ये केलेला आहे. असे अनेक टिकाऊ मिळून ही ज्योत तयार केलेली आहे.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२७ ऑक्टोबर

१) श्रीम. हौलुबाई लक्ष्मण करंजेकर, वरसोली,अलिबाग
२७-१०-१९५०

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

करिश्मा काजारेची पोलीस दलात निवड

। चणेरा । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील लांढर गावची कन्या करिश्मा गीतांजली गणपत काजारे हिची मुंबई कारागृह पोलीस दलात कॉन्स्टेबल पदासाठी निवड झाली आहे. लांढर गावातून पोलीस दलात निवड होणारी पहिली महिला ठरण्याचा मान तिने मिळविल्याने संपूर्ण गावासह रोहा तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. करिश्माच्या निवडीची बातमी गावात समजताच आनंदाला उधाण आले. ग्रामस्थांनी फटाक्यांची आतषबाजी आणि गुलालाची उधळण करीत तिच्या यशाचा जल्लोष साजरा केला. आपल्या गावातील लेकीने पोलीस दलात स्थान मिळविल्याने ग्रामस्थ, नातेवाईक, कला, क्रीडा, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून तिचे अभिनंदन केले जात आहे.



वेणगाव येथे वृक्ष लागवड

वेणगाव : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत वेणगाव येथील स्मशानभूमी परिसरात सरपंच अश्विनी पालकर, कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुशांत पाटील यांच्या हस्ते वड, पिंपळ, कारंज, जांभूळ इत्यादी वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी विस्तार अधिकारी राजपूत, राठोड, कांबळे, ग्रामसेवक केशव जाधव, ग्रामपंचायत सदस्य समीर कडूसकर, समीर पेटे, रमेश मुंडे, शरद पालकर, कृष्णा घाडगे, मंगेश पालकर व ग्रामपंचायत कर्मचारी यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

गतिरोधकाअभावी अपघाताचा धोका

● गोवे स्टॉप जवळील रस्त्यावर अवजड वाहनांची पार्किंग

। कोलाड । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील गोवे स्टॉपजवळ महामार्गाच्या रस्त्याला गतिरोधक नसल्याने या मार्गांवरून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. याशिवाय हायवेच्या दोन्ही बाजूच्या रस्त्याच्या मधोमध असणाऱ्या जागेवर मोठ्या प्रमाणात वाढलेले गवत व रस्त्यावर होणारी अवजड वाहनांची पार्किंग यामुळे या मार्गांवरून प्रवास करणे अतिशय धोकादायक झाले आहे. याच मार्गावर गोवे येथील तरुणाचा अपघाती मृत्यू झाला. यामुळे अपघाताला आळा घालण्यासाठी यांची संबंधितांनी दखल घेऊन उपाययोजना करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

मुंबई-गोवा महामार्गालगत गोवे येथे श्रीमती गिता द. तटकरे पॉलिटेक्निकल कॉलेज, खासगी



औद्योगिक प्रशिक्षण, डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी कला, वाणिज्य, विज्ञान कॉलेज आहे. येथे जाण्यासाठी रायगड जिल्ह्यासह महाराष्ट्रातल्या कनाकोपऱ्यातून असंख्य विद्यार्थी या मार्गांवरून ये-जा करीत असतात. तर गोवे गावातील कोलाड हायस्कूलला जाणारे असंख्य विद्यार्थी तसेच धाटाव एम.आय.डी. जाणारे असंख्य कामगार, कोलाड बाजारपेठेत जाणारे नागरिक याच मार्गाने ये-जा करीत असतात. परंतु, गोवे स्टॉपजवळ गतिरोधक नसल्यामुळे कोलाड बाजूकडून अतिवेगाने येणारी वाहने अपघाताचे कारण ठरत आहेत.

याशिवाय पुई हद्दीतील इंडियन ऑइल पेट्रोल पंपासमोर असंख्य अवजड वाहने रस्त्याच्या बाजूला पार्किंग गेली जात आहेत. या वाहनांच्या पार्किंगमुळे गोवे गावातून येणाऱ्या वाहनचालकांना कोलाड बाजूकडून अतिवेगाने येणारी वाहने दिसत नाही. यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे.

याशिवाय मुंबई-गोवा महामार्गाच्या दोन्ही बाजूच्या मधोमध फुलझाडे लावण्यासाठी मोकळी जागा ठेवली असून या जागेत चार ते पाच फूट गवत वाढलेले आहे. त्यामुळे येथून मार्ग बदलतांना मुंबई बाजूकडून येणारी वाहतूक दिसत नसल्यानेही अपघाताचा धोका वाढला आहे.

> **मुंबई-गोवा महामार्गाच्या कामासाठी करोडो रुपये खर्च करून ही कोणतीही उपाययोजना दिसत नाही. या मार्गांवरील सतत वर्दळ असणाऱ्या गोवे स्टॉपजवळ आवश्यक असणारे गतिरोधक, रस्त्याच्या बाजूला उभी असणारी अवैध अवजड वाहनांची पार्किंग तसेच रस्त्याच्या मधोमध वाढलेले गवत यामुळे होणारे अपघात टाळण्यासाठी संबंधितांकडून उपाययोजना करावी. अन्यथा गोवे ग्रामस्थ रस्ता रोको करतील.**
> **- असिफशेठ सय्यद, पुई ग्रामपंचायतीचे माजी सरपंच**

साईभक्तांची उरण ते शिर्डी पदयात्रा

। उरण । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील ॐ श्री साईराम पदयात्रा मंडळ उरण या मंडळातर्फे रविवार दि.२५ ते सोमवार दि.२ नोव्हेंबर या कालावधीत उरण ते शिर्डी पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या मंडळाचे पदाधिकारी सदस्य, साईभक्त उरणमधून शिर्डीकडे जाण्यासाठी रवाना झाले आहेत. साईबाबाचे नामस्मरण करत भक्तीगीत गात हे पदयात्री २ नोव्हेंबर रोजी शिर्डीत पोहोचणार आहेत. दि.७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ ते १० या वेळेत श्री साई मंदिर, अंबिकावाडी नागाव उरण येथे श्री साई भंडाराचे आयोजन करण्यात आले आहे. पहाटे ४ वाजता श्रीच्या चरण पादुका, पालखी पूजन, काकड आरती, पुढील प्रस्थान, दुपारी १२ वाजता मध्यान्ह आरती व श्री साई चरित्र अध्याय पारायण, दुपारी ३ वाजता ॐ श्री साईनाथाय नमः मंत्राचा जप व पुढील प्रस्थान, सायंकाळी ६:३० वाजता धूप आरती, ६:३० ते ८ भजन कीर्तन भारूड प्रवचन असा पदयात्रेतील दैनंदिन कार्यक्रम आहे.



ठाणाळे आदिवासी वाडीतील रस्त्याचे लोकार्पण

● महिलांचा साडी वाटप करून सन्मान

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

सुधागड तालुक्यातील ठाणाळे आदिवासी वाडी येथील ग्रामस्थांच्या वाहतुकीच्या व प्रवासाच्या सोयीसाठी नव्याने उभारण्यात आलेल्या रस्त्याचा लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. सुधागड पंचायत समितीचे उपसभापती संदेश शेवाळे यांच्या हस्ते व विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत या नूतन रस्त्याचे लोकार्पण करण्यात आले.

नव्याने झालेल्या या पक्क्या रस्त्यामुळे वाडीतील ग्रामस्थ, महिला व विद्यार्थ्यांची वर्षानुवर्षांची वाहतुकीची अडचण दूर झाली असून, आदिवासी वाडीच्या विकासाला एक नवी दिशा मिळाली आहे.

लोकार्पण सोहळ्याच्या निमित्ताने वाडीतील आदिवासी



भगिनींना साडी वाटप करून त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. या उपक्रमामुळे उपस्थितांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

रस्त्याच्या औपचारिक उद्घाटनानंतर उपसभापती संदेश शेवाळे यांनी वाडीतील बंधू-भगिनी, ज्येष्ठ नागरिक आणि स्थानिक कार्यकर्त्यांशी आपुलकीची भेट घेतली. या वेळी त्यांनी ग्रामस्थांसोबत बसून त्यांच्या दैनंदिन अडचणी, स्थानिक समस्या व विविध नागरी विषयांवर सविस्तर चर्चा केली. वाडीतील मूलभूत सुविधा प्राधान्याने सोडवण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

या सोहळ्याला स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, पक्षाचे पदाधिकारी आणि ठाणाळे आदिवासी वाडीतील ग्रामस्थ, महिला तसेच तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

फेरीवाल्यांचे अतिक्रमण; प्रशासनाचे दुर्लक्ष

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबईतील महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांपैकी एक असलेल्या दादर स्थानक परिसरातील फेरीवाल्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. स्थानक परिसरात दिसणारे फेरीवाल्यांचे अतिक्रमण आता मुख्य पुलावरही वाढू लागले आहे. दादर स्थानक पूर्व पश्चिम जोडणाऱ्या मुख्य पुलावर प्रवाशांच्या येण्या-जाण्याच्या मार्गावरच फेरीवाले बिनधास्तपणे विक्री करत असल्याने पादचाऱ्यांच्या रहदारीचा प्रश्न निर्माण झाला आहे.

दादर स्थानकात दररोज लाखो प्रवाशांची वर्दळ असते. नोकरी, व्यवसाय, शिक्षण तसेच अन्य काम ांसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांना



स्थानकातील पुलांचा वापर करावा लागतो. अशा परिस्थितीत पुलावरच फेरीवाल्यांनी जागा व्यापल्यास प्रवाशांना चालताना अडथळे निर्माण होत आहेत. गर्दीच्या वेळेत ही परिस्थिती अधिक गंभीर ठरू शकते. रेल्वे स्थानक परिसरातील अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्याची जबाबदारी संबंधित प्रशासनाची असताना मुख्य पुलावरच विक्री सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे रेल्वे प्रशासन आणि संबंधित यंत्रणा या अतिक्रमणाकडे दुर्लक्ष का करत आहेत, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

मुख्य पुलावरील गर्दी आणि अतिक्रमणामुळे आपत्कालीन परिस्थितीत प्रवाशांच्या हालचालींवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून पुलावरील अनुधिकृत विक्रेते व फेरीवाले हटवावेत आणि प्रवाशांसाठी मोकळा मार्ग उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.प्रवाशांना सुरक्षित आणि अडथळेमुक्त मार्ग मिळण्यासाठी संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे. प्रशासन जागे कधी होणार असा खडा सवाल प्रवाशांकडून विचारला जात आहे.

वामन जांभळे यांचे निधन

माथेरान : क्षत्रीय मराठा समाजाचे जेष्ठ सदस्य वामन बाबाजी जांभळे (८५) यांचे रविवारी दि.२५ अल्पशा आजाराने निधन झाले. उद्योजक



विनोद जांभळे, मनोज जांभळे, पत्रकार तुषार जांभळे यांचे ते वडील होते. त्यांच्या अंत्ययात्रेत विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होती. वामन जांभळे यांच्या पश्चात पत्नी माजी नगरसेविका वासंती जांभळे, तीन मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

पेण येथे बांधकाम व्यावसायिकांची बैठक

। पेण । प्रतिनिधी ।

बँक ऑफ बडोदा, नवी मुंबई क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने पेण येथे बांधकाम व्यावसायिक व रिअल इस्टेट विकासकांची बैठक आयोजित करण्यात आली. बँकेच्या सुरू असलेल्या 'होम लोन कनेक्ट' अभियानाला चालना देणे तसेच 'मुंबई ३.०' अंतर्गत निर्माण होणाऱ्या रिअल इस्टेट क्षेत्रातील संधींबाबत चर्चा करणे हा या बैठकीचा मुख्य उद्देश होता.

या बैठकीला उदय साते, रवींद्र मोरे यांच्यासह अनेक प्रतिष्ठित बांधकाम व्यावसायिक उपस्थित होते. या बैठकीत परिसरातील गृहबांधणी क्षेत्रातील संधी, गृहकर्जाची वाढती मागणी,



ग्राहकांना मिळणाऱ्या बँकिंग सेवा आणि बांधकाम व्यावसायिक व बँक यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली.

यावेळी बँक ऑफ बडोदा, नवी मुंबई क्षेत्राचे प्रादेशिक व्यवस्थापक तथा उपमहाव्यवस्थापक मनीष कुमार सिन्हा आणि नवी मुंबई क्षेत्राच्या गृहकर्ज विभागाचे प्रमुख रवी कुमार रेड्डी यांनी मार्गदर्शन केले. तसेच वडखळ, अलिबाग, रेवदंडा, पेण, वढाव आणि सीवूड्स येथील शाखा व्यवस्थापकांनीही या बैठकीत सहभाग घेतला.

यावेळी मनीष कुमार सिन्हा यांनी बँक ऑफ बडोदाच्या ग्राहककेंद्रित कार्यपद्धतीवर प्रकाश टाकला. गृहकर्जावरील स्पर्धात्मक व्याजदर, कर्ज मंजुरीसाठी लागणारा कमी कालावधी, जलद सेवा आणि ग्राहकांना सुलभ पद्धतीने कर्ज उपलब्ध करून देण्याच्या बँकेच्या प्रयत्नांची त्यांनी माहिती दिली.

बैठकीदरम्यान बँकेच्या विविध गृहकर्ज योजनांची माहिती देण्यात आली. बँक ऑफ बडोदा, नवी मुंबई क्षेत्राच्या या उपक्रमामुळे पेण, रायगड आणि आसपासच्या परिसरातील गृहकर्ज व्यवसायाला चालना मिळण्यास तसेच 'होम लोन कनेक्ट' अभियानाच्या माध्यमातून अधिकाधिक ग्राहकांपर्यंत बँकेच्या योजनांची माहिती पोहोचण्यास मदत होणार आहे.

पाथरज ग्रामपंचायतीने पटकावला पहिला नंबर | **पाणीटंचाई निवारण उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद**

कर्जतमध्ये तीन दिवसात १३३ वनराई बंधारे

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुका पाणीटंचाई आराखडा तयार करण्याच्या बैठकीत आमदार महेंद्र थोरवे यांनी सर्व ५५ ग्रामपंचायतमध्ये वनराई बंधारे बांधण्याचे उदिष्ट ठेवावे, असे आवाहन केले होते. त्यानंतर कर्जत तालुक्यातील सर्व ग्रामपंचायती सरसावल्या असून तालुक्यात तीन दिवसात १३३ वनराई बंधारे बांधण्यात आले. तर तालुक्यात पाथरज ग्रामपंचायतीने बाजी मारली असून तब्बल सात वनराई बंधारे बांधून पहिला नंबर मिळविला आहे.

कर्जत तालुक्यात सप्टेंबर



मध्यापासून पाऊस पडलेला नाही. त्यामुळे भाताची शेती शेतच करपून गेली आहे, तर तालुक्यात पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होण्याची शक्यता बळावली आहे. या परिस्थितीवर मात करण्यासाठी कर्जत तालुका पाणीटंचाई आराखडा कृती समितीची बैठक कर्जत तहसीलदार कार्यालयात झाली. त्यावेळी आ. महेंद्र थोरवे यांनी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये वनराई बंधारे बांधून पाणी अडवले पाहिजे, तर ज्या ठिकाणी सिमेंट बंधारे आहेत तेथील बंधाऱ्यामधून पाण्याची गळती होणार नाही यासाठी नियोजन करण्याचे आवाहन केले होते. कर्जत तालुक्यात मागील तीन दिवसात तब्बल १३३ वनराई बंधारे बांधले आहेत. तालुक्यातील सर्व ५५ ग्रामपंचायतींनी पाणीटंचाई निवारण उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

तालुक्यात पाथरज ग्रामपंचायतमध्ये सर्वाधिक सात बंधारे आतपर्यंत बांधले गेले असून तेथील ग्रामपंचायत अधिकारी धनाजी बुरुड यांचे कौतुक होत आहे. तर तालुक्यातील बोरिवली, वावलोली, मोग्रज आणि अंभेरपाडा या चार ग्रामपंचायती यांनी प्रत्येकी पाच वनराई बंधारे बांधून पूर्ण केले आहेत. त्या ग्रामपंचायतमधील ग्रामपंचायत अधिकारी तारामती दातीर, धनंजय देशमुख, रांभाजी श्रीखंडे आणि वैशाली पाटील यांचे कौतुक होत आहे. याशिवाय कर्जत तालुक्यातील दामत, वारे, खांडपे आणि नांदगाव ग्रामपंचायत यांनी प्रत्येकी चार वनराई बंधारे बांधले आहेत. त्याचप्रमाणे उकरूळ, दहिवली तर्फे वरेडी, कळंब, शिरसे, नसरापूर, जामरुंग, ओलमन आणि मांडवणे या ग्रामपंचायत यांनी प्रत्येकी तीन तर नेरळ, शेलू, पाषाण, भालिवडी, माणिवली, पोशिर, साळोख तर्फे वरेडी, बीड बुद्रुक, वैजनाथ, वदप, वरई, सावेळे, कोंडिवडे, रजपे आणि जांभिवली या ग्रामपंचायती यांनी प्रत्येकी दोन वनराई बंधारे आपल्या हद्दीत बांधून पाणी अडवण्याचे काम केले आहे.

तालुक्यातील पळसदरी, माणगाव तर्फे वरेडी, हालीवली, किरवली, ममदापूर, कोल्हारे, वाकस, तिवरे, पोटल, हुमगाव, जिते, वैजनाथ, पाली तर्फे कोतवाल खलाटी आदी ग्रामपंचायतमध्ये प्रत्येकी एक वनराई बंधारे बांधले आहेत.

निवडक

श्रीपंत महाराज बाळेकुंद्री यांची १२१ वी पुण्यतिथी

अलिबाग : श्रीपंत महाराज बाळेकुंद्री यांच्या १२१ व्या पुण्यतिथीनिमित्त २७ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर अशा ३ दिवसीय



उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवादरम्यान पहिल्या दिवशी म्हणजेच २७ ऑक्टोबरला श्रीपंत वाडा, समादेवी गल्ली, बेळगांव येथून प्रेमध्वजाची मिरवणूक काढण्यात येणार आहे. ही मिरवणूक सकाळी ५ वाजता निघणार असून दुपारी २ वाजता श्रीक्षेत्र पंतबाळेकुंद्रीला वाड्यामध्ये पोहोचेल. त्यांनतर रात्री ८ वाजता प्रेमध्वजारोहण होऊन उत्सवास सुरुवात होईल. तर उत्सवाच्या दुसऱ्या दिवशी पहाटे ५ वाजता श्री पुण्यस्मरण कार्यक्रम पार पडणार आहे. त्यानंतर सकाळी ७ वाजता श्रींची पालखी गावातील श्रींच्या वाड्यातून निघेल. दोनप्रहरी आमराईतील श्रीपंतस्थानी येईल आणि रात्री ८ ते १२ पालखी सेवा होईल. तर तिसऱ्या दिवशी म्हणजेच २९ ऑक्टोबरला महाप्रसाद, प्रेमानंद टिपरी कार्यक्रम झाल्यानंतर पालखी गावातील वाड्यात नेऊन उत्सवाची सांगता होईल.



लोकसहभागातून वनराई बंधारा

म्हसळा : म्हसळा तालुक्यातील चिचोंडे आदिवासीवाडीत लोकसहभागातून वनराई बंधारा बांधण्यात आला. ग्रामस्थांनी एकत्र येत राबविलेल्या या उपक्रमामुळे जलसंधारणाचा आदर्श निर्माण झाला आहे. चिचोंडे येथील आदिवासी ग्रामस्थांच्या सहभागातून रविवारी (दि.२५) हा वनराई बंधारा बांधण्यात आला. पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत मुरविणे, पाण्याची उपलब्धता वाढविणे आणि परिसरातील शेतीला पूरक जलस्रोत निर्माण करणे, हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू आहे. बंधाऱ्यात साठणाऱ्या पाण्याचा उपयोग शेतीच्या गरजांसाठी होणार आहे. वनराई बंधाऱ्यामुळे भूजलपातळी वाढण्यास मदत होते. विशेषतः आदिवासी वाड्यांमध्ये उन्हाळ्यात जाणवणारी पाणीटंचाई कमी करण्यासाठी अशा छोट्या जलसंधारणाच्या कामांचे महत्त्व मोठे आहे. ग्रामस्थांनी श्रमदानातून केलेला हा प्रयत्न भविष्यात इतर गावांसाठीही प्रेरणादायी ठरू शकतो. या उपक्रमासाठी ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. जलसंधारणाची कामे केवळ शासकीय यंत्रणेवर अवलंबून न ठेवता लोकसहभागातून राबविल्यास ग्रामीण भागातील पाणीप्रश्न सोडविण्यास निश्चितच हातभार लागू शकतो, हे या उपक्रमातून अधोरेखित झाले आहे.



विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

माथेरान : अक्षया शक्ती वेल्फेअर असोसिएशन, उल्हासनगरच्या सदस्या सिमरन सिंह यांनी माथेरानच्या प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिर शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शनिवारी (दि.२४) शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. सिमरन या किन्नर अस्मिता समाज फाउंडेशनच्या अध्यक्षा आहेत. 'ये हाथ सिर्फ लेने के लिए नही बने है देने के लिए भी बने है' हे ब्रीद वाक्य त्यांनी वेळोवेळी सिद्ध करून दाखवलेले आहे. सामाजिक कार्यकर्त्या वर्षा शिंदे यांच्या माध्यमातून दरवर्षी होणाऱ्या असवाष्ण महिलांच्या तिळगुळ समारंभात सिमरन यांनी आपल्या गुरूच्या वाढदिवसानिमित्त साड्यांचे वाटप केले होते. माथेरानच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यासाठी सिमरन यांची माथेरान येथील मैत्रिण वर्षा शिंदे आणि रेखा चौधरी यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाला माथेरान शिक्षण समितीचे सभापती (नगरसेवक) सुनील शिंदे, नगरसेविका प्रतिभा घावरे, नगरसेविका सुरेखा साळुंखे तसेच पालक समितीचे राजू सपकाळ उपस्थित होते.



आदिवासी कुटुंबियांना धान्यवाटप

नेरळ : कर्जत तालुक्यातील जांभूळवाडी येथील जिल्हा परिषद शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वर्षभर पुरेल एवढे शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. तर येथील सर्व आदिवासी कुटुंबियांना वर्षभर पुरेल एवढे धान्याचे वाटप श्री साई ट्रस्ट आणि टू वर्षीप या संस्थेचे माध्यमातून करण्यात आले. टू वर्षीप मुंबई व श्री साई ट्रस्ट नवी मुंबई यांच्या सहकार्याने कर्जत तालुक्यातील आदिवासी भागातील वारे ग्रामपंचायत हद्दीतील रायगड जिल्हा परिषद शाळा जांभूळवाडी येथील शालेय विद्यार्थ्यांना वर्षभर पुरेल इतके शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आले. संस्थेचे पदाधिकारी जयश्री जेठवाणी आणि अनिता यांचे हस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तर आदिवासी वाडीमधील सर्व कुटुंबीय यांना वर्षभर पुरेल एवढे धान्य यांचे वाटप श्री साई ट्रस्ट संचालिका राधिका घुले आणि संजय यांचे हस्ते करण्यात आले. त्यावेळी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक दिलीप घुले तसेच जिल्हा परिषद शाळांचे शिक्षक सैदाने, राठोड, कोळी आदी उपस्थित होते.

पर्ससीन मासेमारी करणाऱ्यांवर कारवाई

रत्नागिरी : देवगड बीच परिसरात अवैध पद्धतीने पर्ससीन मासेमारी करणाऱ्यांवर मत्स्यव्यवसाय विभागाने कठोर कारवाई केली. सकाळी १० वाजता अधिकाऱ्यांनी देवगडची 'स्वामीराज' ही नौका जप्त करून देवगड बंदरात आणली. त्यावेळी अन्य पर्ससीन नौका चालकांनी अधिकाऱ्यांना पाहताच पळ काढला. देवगड समोर केवळ ३ ते ४ वाव पाण्यात महाराष्ट्र सागरी मासेमारी सुरू असल्याची माहिती मिळताच तात्काळ कारवाई करण्यात आली. 'स्वामीराज' नौकेची कसून तपासणी केली असता एकूण २६ परप्रांतीय खलाशी आढळून आले.

महापालिकेचा महिला सक्षमीकरणावर भर

| कळंबोली | प्रतिनिधी |

महिलांचे आर्थिक सक्षमीकरण आणि मुलींच्या शैक्षणिक प्रगतीला चालना देण्याच्या दृष्टीने पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभेत दोन महत्त्वपूर्ण विषयांना मंजुरी देण्यात आली. मुलींची शाळेतील गळती रोखणे, त्यांची नियमित उपस्थिती वाढविणे आणि महिला बचत गटांना व्यवसायासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे, या निर्णयांमुळे महिला व मुलींच्या विकासाला प्रोत्साहन मिळण्याची अपेक्षा आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीची सभा सभापती ममता म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली महापौर कार्यालयातील बैठक कक्षात पार पडली. या सभेत महिलांचे



सक्षमीकरण, मुलींचे शिक्षण आणि महिला बचत गटांच्या आर्थिक उन्नतीशी संबंधित विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मुलींची शाळेतील गळती रोखणे, शाळेतील नियमित उपस्थिती वाढविणे आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे, या उद्देशाने उपस्थिती भत्ता व शैक्षणिक गुणवत्ता वाढीस प्रोत्साहन देणारी योजना सुरू करण्याच्या प्रस्तावाला सभेत मंजुरी देण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यास आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना देण्यास मदत होणार आहे.

महिला बचत गटांना त्यांच्या व्यवसायाच्या गरजेनुसार आवश्यक साधनसामग्री खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावालाही मंजुरी देण्यात

- **मुलींच्या शिक्षणाला देणार प्रोत्साहन**
- **महिला बचत गटांना मिळणार अर्थसहाय्य**

आली. यामध्ये शिलाई मशीन, घरघंटी, मिरची कांडप मशीन, भाकरी मशीन, पत्रावळी मशीन तसेच इतर आवश्यक व्यावसायिक उपकरणांचा समावेश आहे.

या उपक्रमामुळे महिला बचत गटांची व्यवसायक्षमता वाढविणे, उत्पन्नाचे स्रोत निर्माण करणे आणि महिलांना स्वावलंबी उद्योजक बनण्यासाठी प्रोत्साहन देणे शक्य होणार आहे. महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी आर्थिक संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे. दरम्यान, पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील महिलांना स्वतंत्र, सुरक्षित आणि सुलभ व्यायाम शाळा तसेच क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याचा विषयही सभेत चर्चेला आला. महिलांमध्ये नियमित व्यायामाची सवय वाढविणे आणि क्रीडा सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी या विषयावर सविस्तर चर्चा करण्याची सूचना समिती सदस्यांनी केली.

सभेला महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांसह विभागाच्या उपायुक्त डॉ. रूपाली माने, विभागप्रमुख कीर्ती महाजन, वैद्यकीय अधिकारी डॉ. मनिषा चांडक तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.सभेत यापूर्वीच्या बैठकींमध्ये चर्चिलेल्या विषयांवरील कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. तसेच ऐनवेळच्या विषयांवरही चर्चा करण्यात आली.

निवडक



आयुर्वेदिक उपचाराचे कर्जतकरांकडून कौतुक

नेरळ : गेली चार वर्षे आयुर्वेदिक उपचार शिबीर आयोजित करणाऱ्या शिबिराला उपस्थिती लावत कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांनी स्वतः अग्निकर्म उपचार करून घेत आयुर्वेदिक उपचार पद्धतीचे कौतुक करीत सर्वांना आवाहन केले. कर्जत येथे माजी आमदार तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान, कर्जत, दादर-मुंबईतील ज्योविस आयुर्वेद आणि नारी सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने स्व पत्रकार वसंत ठाकूर स्मृती प्रीत्यर्थ आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराचे आयोजन केले होते.आमदार तुकाराम सुर्वे प्रतिष्ठानने आयोजित केलेले ४१ वे आरोग्य शिबीर होते. कर्जत शहरातील श्री धापया महाराज मंदिराच्या सभागृहात मोफत आयुर्वेदिक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन कर्जतच्या नगराध्यक्ष पुष्पा दगडे यांच्या हस्ते यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून करण्यात आले. याप्रसंगी मुंबई दादर येथील ज्योविस आयुर्वेदाचे डॉ. राज सातपुते, उपनगराध्यक्ष संतोष पाटील तसेच नगरसेवक अशोक राऊत, राजाभाऊ कोठारी, महेंद्र चंदन, प्रशांत पाटील, सुचिता खोत, नेहा शिंदे, मानसी कानिटकर, आदी मान्यवर उपस्थित होते. प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे, अभियंता अरुण गुरव, कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ रवींद्र मर्दाने, अमोल साखरे, मनीषा सुर्वे तसेच योगेश देशमुख, राजेश ओसवाल, यश सुर्वे, प्रदीप गोगटे आदी उपस्थित होते.



कचरा व्यवस्थापन शिबिराचे आयोजन

मुरुड : महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी रायगड जिल्हा कार्यालय, अलिबाग आणि मणिरी वेस्ट मॅनेजमेंट फाऊंडेशन , महाड, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने मुरुड येथील गणेश मंदिरात नुकतेच कचरा व्यवस्थापनावर मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले. मणिरी वेस्ट मॅनेजमेंट फाऊंडेशनच्या प्रवर्तकममता मेहता यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना गत १० वर्षांहून फाऊंडेशनच्या माध्यमातून कचरा हा संसाधन म्हणून वापरता येतो. कचरा मुक्त मोहिमेसह इलेक्ट्रॉनिक कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करून त्यावर सायंटिफिक पद्धतीने रिसायकलिंग प्रक्रिया केली जात असल्याचे सांगुन सुका कचरा संकलनाचे कार्य हाती घेतल्याची महिती दिली.प्लास्टिक पिशव्यांचा वापर थांबविण्यासाठी जनजागृतीसाठी स्वयंसेवी संघटनांनी पुढे यावे असे आवाहन केले. यावेळी शैलेश मराठे, ममता मेहता, विनोद भगत, शुभांगी जोशी, मृदुला आबदेव आदी मान्यवर उपस्थित होते.



पाण्यासाठी चिल्हार नदीचे खोलीकरण

नेरळ : कर्जत तालुक्यावर पाण्याचे दुर्भिक्ष्य आल्याने भविष्यातील पाण्याचीपातळी वाढावी यासाठी आमदार महेंद्र थोरवे यांनी आवाहन केले आहे. त्यानुसार चिल्हार नदी खोलीकरण करण्याचे काम सुरू केले आहे. नदीचे खोलीकरण केल्याने तेथील सिमेंट बंधाऱ्यातील पाण्याची साठवण क्षमता वाढवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. आमदार महेंद्र थोरवे यांनी कर्जत तालुक्यावर आलेले पाणी संकट काही प्रमाणात कमी करण्यासाठी सर्व राजकारण बाजूला ठेवण्याचे आवाहन केले आहे.तालुक्यातील सर्व ५५ ग्रामपंचायत मध्ये वनराई बंधारे बांधण्याचे काम लोकसहभागातून सुरू झाले आहे. अनेक ठिकाणी पाण्याची भूजल क्षमता वाढवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. त्यानंतर जेसीबी मशीन घेऊन चिल्हार नदी गाठली. तेथील चिल्हार नदीमध्ये असलेले सिमेंट बंधारे पुन्हा पाण्याने भरावेत आणि काही प्रमाणात पाणी साठवले जावे यासाठी तेथे नदी खोलीकरण करण्यास सुरुवात झाली आहे. नदी खोलीकरण करण्याचे कामाची पाहणी प्रसाद थोरवे यांनी उपस्थितीत राहून केली.त्यावेळीं माजी उप सरपंच संदेश सावंत यांनी सहकारी कार्यकर्त्यांसह चिल्हार नदीमधील सर्व सिमेंट बंधारे यांच्या परिसरात नदी खोलीकरण करण्याचे काम सुरू केले असल्याची माहिती दिली. सोलनपाडा पाझर तलावातील पाणी नदीमध्ये वाहत असते, ते पाणी अडवून ठेवण्यासाठी बांधलेले सिमेंट बंधारे यांना गळती लागली आहे. त्यामुळे नदी खोलीकरण करीत असताना आधी मातीने भरलेल्या पिशव्या टाकून पाण्याच्या गळतीवर मात करण्यात येत आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे : रिसेप्शनिस्ट २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन १ जागा, हाऊसकीपर फक्त पुरुष (२ जागा), इंडियन चायनीज कुक १ जागा, मोरी - १ जागा, वेटर - १ जागा. इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक: ७५५९१८४६१२
- S.T. स्टँड जवळ, अजंठा लाँच ऑफिसच्या वर, पहिल्या मजल्यावरील 1BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे. संपर्क : ९५५२१८३७६१
- नोकरीची सुवर्णसंधी! - अलिबाग येथील ऑफिससाठी स्टाफ पाहिजे!, ऑफिसमध्ये काम करण्यासाठी कर्मचारी आवश्यक, आकर्षक पगार, नोकरीचे ठिकाण: अलिबाग, रायगड मुलाखतीसाठी आजच संपर्क साधा! ९९२३७५०५३९/९१०५७१७०३८ इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा! चांगल्या पगारासह नोकरीची उत्तम संधी!
- कामासाठी माणसे गरजु मुले पाहिजे
१)मोबाईल डिलेव्हरीसाठी -पेण, पोयनाड, वडखळ, रेवदंडा, मुरूड, इतर मोटारसाईकलने बाईक आमची (लाईसन्स पाहिजे) २) कॉम्प्युटर ऑपरेटर लेडीज/जेन्टस, ३)पार्ट/ फुल टाईम पाहिजे. मो. ८८८८२२०२२१
- एक ते तिन गुंठे जमिन विकत तसेच जुना/नवीन घर भाड्याने किंवा विकत पाहिजे. ७३७८४८०१५१.
- स्टॉलवर कामासाठी बाई/मुलगी पाहिजे. ७३७८४८०१५१.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

शबरी माता जन्मोत्सव



| पेण | प्रतिनिधी |

बेलवडे येथील शबरी वाडीमध्ये गेल्या १६ वर्षांपासून शबरी माता जन्मोत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो. यंदाही विविध धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून हा उत्सव उत्साहात पार पडला.

शबरी मातेला अभिषेक घालण्यात आला. त्यानंतर सत्यनारायण महापूजा व गुरुभक्त प्रशांत मोठे वढावकर यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले. या कीर्तनाला गणपत हिलम आणि नामदेव ढमढेरे यांनी साथ दिली. यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सायंकाळी हरिपाठ व हरिजागर असे धार्मिक कार्यक्रम पार पडले. बेलवडे येथील शबरी वाडीमध्ये शबरी मातेचे मंदिर असून, ही वाडी व्यसनमुक्तीसाठी ओळखली जाते.

महाविद्यालयीन तरूणांनी जपली सामाजिक बांधिलकी

| चणेरा | प्रतिनिधी |

सुट्टीच्या दिवशी मोबाईल, टीव्ही आणि सोशल मीडियामध्ये वेळ वाया घालवणाऱ्या आजच्या पिढीला आदर्श घालून देणारे काम रोह्यातील काही ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी केले आहे. रोहा शहरातील दहावी ते बारावीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी एकत्र येत नदीकिनारी असलेला मॉर्निंग वॉक ट्रॅक स्वच्छ करून आपली सामाजिक जबाबदारी जपली आहे. सत्यम कृष्णा राय, आर्यन अमोल पाटील, रौनक राजेंद्र राजभर, साहिल संजय रोकडे, श्रेय सदानंद वरंडे, सुंदरम राय आणि इब्राहिम कासकर अशी या विद्यार्थ्यांची



- **सुट्टीच्या दिवशी मॉर्निंग वॉक ट्रॅक केला स्वच्छ**
- **एक ते दीड टन कचरा गोळा करत दिला स्वच्छतेचा संदेश**

नावे आहेत. हे सर्व विद्यार्थी वेगवेगळ्या ज्युनिअर कॉलेजला शिक्षण घेत आहेत, एकत्रितपणे फुटबॉल खेळणे हा त्यांचा छंद आहे. नेहमीप्रमाणे फुटबॉल खेळण्यासाठी एकत्र आलेल्या या मुलांचे लक्ष नदीकिनारी असलेल्या मॉर्निंग वॉक ट्रॅकवरील वाढलेल्या कचऱ्याकडे गेले. त्यानंतर सुट्टीचा दिवस सत्कारणी लावण्याचा निर्णय घेत या सर्वांनी हातात पोते आणि हातमोजे घेत संपूर्ण ट्रॅकवर आणि बाजूला पडलेला कचरा गोळा केला. या स्वच्छता मोहिमेत त्यांनी साधारणपणे एक ते दीड टन कचरा, प्लास्टिक, बाटल्या आणि इतर टाकाऊ वस्तू गोळा केल्या.

> आम्ही काही विद्यार्थी नियमित फुटबॉल खेळतो, इथे कचरा पडलेला पाहून वाईट वाटायचे. म्हणून आम्हीच ठरवले की, कोणी येऊन साफ करेल याची वाट पाहण्यापेक्षा आपणच साफ करूया. हे शहर आपले आहे, ते स्वच्छ ठेवणे ही आपलीच जबाबदारी आहे.
> -सत्यम कृष्णा राय, विद्यार्थी

सुधागड किल्ल्यावर गड अन् शस्त्र पूजन

आगामी संवर्धन मोहिमेचा आराखडा तयार

| पाली/ बेणसे | प्रतिनिधी |

दसऱ्याच्या पवित्र औचित्य साधून बा रायगड परिवाराच्या वतीने ऐतिहासिक सुधागड किल्ल्याावर पारंपरिक पद्धतीने गड पूजन आणि शस्त्र पूजन उत्साहात पार पडले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही विजयापंचमीच्या निमित्ताने गडावर या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच, आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या गड संवर्धन मोहिमेचा सविस्तर आराखडा यावेळी तयार करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात गडावरील विधिवत पूजा व



पूजनाने झाली. शिवकालीन संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्याचा व युवकांमध्ये गड-किल्ल्यांविषयी जनजागृती निर्माण करण्याचा विडा बा रायगड परिवाराने उचलला आहे. याच पार्श्वभूमीवर यंदाच्या मोहिमेच्या आगामी नियोजनावर उपस्थित सदस्यांनी सविस्तर चर्चा केली.

या सोहळ्यात बा रायगड परिवाराचे प्रमुख सदस्य प्रधान काका, योगेश साजेकर, पारस तेलंगे, प्रणव खंकाळ, महेंद्र शिद यांच्यासह दुर्गप्रेमी अमित दंत आणि परिसरातील अनेक दुर्गसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आगामी संवर्धन मोहिमेची दिशा ठरविण्यात आली असून, लवकरच प्रत्यक्ष कामास सुरुवात होणार आहे.

श्रीवर्धनला होणार कोमसापची गीत संध्या

श्रीवर्धन शहर : कोकण मराठी साहित्य परिषदेच्या श्रीवर्धन शाखेची वार्षिक सर्वसाधारण सभा श्रीवर्धन येथील भाऊ जोशी यांच्या मंगल कार्यालयात संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी शाखेच्या अध्यक्षा सीमा रिसबूड होत्या. सालाबादप्रमाणे ९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी दीप संध्या हा कार्यक्रमही आयोजित करण्याचे ठरविण्यात आहे. सभेमध्ये उपाध्यक्ष प्रसाद जोशी, प्रविता माने, पद्मजा कुळकर्णी आदिंनीही आपले विचार मांडले. संस्थेचे सदस्य आनंद जोशी यांच्या वयाला ऐंशी वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांचा शाल, श्रीफळ देऊन उचित सत्कार करण्यात आला.



अंगावर पेट्रोल ओतून जाळण्याचा प्रयत्न
दोघे पोलिसांच्या ताब्यात

| उरण | प्रतिनिधी |

दुचाकीवरून घरी जाणाऱ्या तरुणाला रस्त्यात अडवायचे, लोखंडी हत्याराने डोक्यावर सपासप वार करायचे आणि त्यानंतर अंगावर पेट्रोल ओतून पेटवून द्यायचे, असा अंगाचा थरकाप उडवणारा प्रकार उरण परिसरात घडला आहे. या जीवघेण्या हल्ल्याप्रकरणी उरण पोलिसांनी वेगाने तपासाची चक्रे फिरवत दोन्ही आरोपींना अवघ्या २४ तासांत अटक केली आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

आरोपी अष्टांग ऊर्फ सर्वेश हरेश्वर पाटील आणि ऋतिक पांडुरंग चाळके यांचा फिर्यादीसोबत पूर्वीपासून वाद होता. याच वादाचा राग मनात धरून दोघांनी हल्ल्याचा कट रचल्याचा आरोप आहे. फिर्यादी सायंकाळी नेहमीप्रमाणे मोटारसायकलवरून कामावरून घरी जात असताना आरोपी बुलेट मोटारसायकलवरून त्यांच्या मागावर आले. रस्त्यात फिर्यादी यांना अडवून खाली उतरवले आणि पकडून ठेवत लोखंडी हत्याराने डोक्यावर पाच ते सात वार केले.

इतक्यावरच आरोपी थांबले नाहीत. फिर्यादी यांना जमिनीवर पाडल्यानंतर सोबत आणलेल्या बाटलीतील पेट्रोल त्यांच्या अंगावर ओतून आग लावल्याचा गंभीर आरोप आहे. जुन्या वादातून थेट जिवावर उठण्यापर्यंत मजल गेल्याने या घटनेचे गांभीर्य अधिक वाढले आहे.या प्रकरणी उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन उरण पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे शोधमोहीम राबवली.या तपासातून अष्टांग ऊर्फ सर्वेश हरेश्वर पाटील आणि ऋतिक पांडुरंग चाळके या दोघांना नवी मुंबई परिसरातून अटक करण्यात आली. दोन्ही आरोपींना २७ ऑक्टोबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. या कारवाईसाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर, पोलीस निरीक्षक राहुल काटवानी, पोलीस उपनिरीक्षक गोविंद केंद्रे, सहाय्यक पोलीस निरीक्षक भरत पाटील, वैभव रोंगे, पोलीस उपनिरीक्षक रोशन काथारा, जयंत घरत, शशिकांत घरत, किशोर फंड, अनिल मानकर, गंगाराम कचरे, रियाज शेख आणि बसवराज सकपाळ यांनी सहभाग घेतला.

नेरळ फाटक ते साई मंदिर रस्त्याच्या कामाला प्रारंभ

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान-नेरळ-कळंब या राज्यमार्ग रस्त्यावर नेरळ रेल्वे फाटक ते निर्माण नगरीकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम अनेक महिने थांबले होते. त्या भागातील रस्त्याच्या काँक्रीटीकरण कामाला सुरुवात झाली आहे.या रस्त्याच्या आजूबाजूचे अतिक्रमण काढण्यात आल्याने रस्त्याच्या दोन्ही बाजूला संरक्षण भिंत देखील बांधण्यात येत आहे.

नेरळ रेल्वे फाटकापासून साई मंदिर या भागातील २०० मीटर लांबीचा रस्ता गेली अनेक वर्षे अरुंद होता.मात्र त्यावेळी माथेरान नेरळ कळंब रस्त्याचे रुंदीकरण आणि काँक्रीटीकरण



जुना साकव पूल तोडला
निर्माण नगरी भागाच्या वळणावर असलेले जुना साकव पूल नवीन रस्त्याच्या कामात तोडण्यात आले आहे.येथे नवीन पुलाचे काम एएसआयडीसीकडून सुरू आहे. त्यामुळे अरुंद साकव पुलाचा जागी रुंद रस्ता नवीन पुलामुळे निर्माण होणार आहे.

होत असताना रेल्वे फाटक ते साईमंदिर भागातील निर्माण नगरी पर्यंतचा रस्ता अरुंदच होता.मात्र संपूर्ण रस्त्याचे रुंदीकरण केले वेगाने सुरू असल्याने आता नेरळ रेल्वे फाटक ते साई मंदिर भागातील २०० मीटर लांबीच्या रस्त्यावर काँक्रीटीकरण सुरू झाले आहे.रस्त्यावर दोन गाड्यांची वाहतूक होईल अशाप्रकारे रुंदीकरण करून काँक्रीटीकरण केले जात आहे.नेरळ कळंब हा राज्यमार्ग रस्ता मुरबाड कडे जाणारा महत्वाचा रस्ता असल्याने तसेच नाशिक भागातून माथेरान या पर्यटन स्थळी येणारे पर्यटक यांच्यासाठी देखील महत्वाचा असल्याने रस्त्याचे काँक्रीटीकरण व्हावे यासाठी आमदार महेंद्र थोरवे यांचा सतत पाठपुरावा सुरू आहे.

मॅजिक बस इंडिया फाऊंडेशनचा स्तुत्य उपक्रम | ५१ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

चित्रकला स्पर्धेतून लिंगभेद निर्मूलनाचा संदेश

| खोपोली | प्रतिनिधी |

मुलगा-मुलगी समानतेचा संदेश देत सामाजिक जाणीव रुजविण्याच्या उद्देशाने मॅजिक बस इंडिया फाऊंडेशनच्या वतीने श्री छत्रपती विद्यालय, वावोशी येथे लिंगभेद समानता या विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विद्यालयातील ५१ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत चित्रांच्या माध्यमातून स्त्री-पुरुष समानता, शिक्षणातील समान संधी आणि लिंगभेद निर्मूलनाचा संदेश प्रभावीपणे मांडला.

शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये



लिंगभेदाविषयी जागरूकता निर्माण करणे, मुलगा आणि मुलगी यांच्यात भेदभाव न करता दोघांनाही समान संधी मिळण्याचे महत्त्व पटवून देणे, समानतेवर आधारित समाजनिर्मितीसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा आणि कलागुणांचा वापर करून रंगांच्या माध्यमातून सामाजिक विषयावरील विचार मांडले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मुलगा-मुलगी समानता, स्त्री-पुरुषांचे समान हक्क, शिक्षणातील समान संधी तसेच समाजातील भेदभाव दूर करण्यासंदर्भातील संदेश चित्रांद्वारे व्यक्त केले.

स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी बक्षिसे देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्याबरोबरच सामाजिक विषयांबाबत विचार करण्याची संधीही उपलब्ध झाली. या कार्यक्रमाला श्री छत्रपती विद्यालयातील शिक्षकवर्ग, मॅजिक बस इंडिया फाऊंडेशनच्या क्लस्टर मॅनेजर भारती भालेराव आणि त्यांचे सहकारी उपस्थित होते. उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे कौतुक करत समानतेसारख्या महत्त्वपूर्ण विषयावर त्यांनी व्यक्त केलेल्या विचारांचे स्वागत केले.

तसेच यावेळी विद्यार्थ्यांना शिक्षण, खेळ, करिअर आणि जीवनातील प्रत्येक क्षेत्रात मुलगा व मुलगी यांना समान संधी मिळणे आवश्यक असल्याचे पटवून देण्यात आले.

प्रत्येक व्यक्तीचा आदर करणे, एकमेकांच्या हक्कांचा सन्मान राखणे आणि समानतेची भावना दैनंदिन जीवनात रुजविणे गरजेचे असल्याचेही अधोरेखित करण्यात आले. मॅजिक बस इंडिया फाऊंडेशनच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, परस्पर आदर आणि समानतेची मूल्ये रुजविण्यास मदत झाली.

कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना,
महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, रायगड अलिबाग

कार्यकारी अभियंता, प्रधान मंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, रायगड, ''वेदांत'' इमारत, रूम नं. ०१, तळ मजला, पंतनगर, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड. पिन - ४०२ २०१
office Tel :- ९६५७२६०४१८ Email:- mh-rai@pmgsy.nic.in

निविदा सूचना क्रमांक ०२/२०२६-२७

कार्यकारी अभियंता, प्रधान मंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, रायगड या कार्यालयातील कार्यकारी अभियंता यांचेसाठी एक वाहन व उप अभियंता (प्रमंग्रासयो), उप विभाग- माणगाव, पनवेल, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, रायगड यांचेसाठी प्रत्येकी एक वाहन प्रतिमाह दराने भाड्याने घेणेकरिता सिलबंद निविदा मागवित आहोत. दि. २७.१०.२०२६ पासून ते दि.०२.११.२०२६ पर्यंत निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर निविदेची माहिती वरील कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर उपलब्ध आहे. तसेच कोऱ्या निविदा फॉर्म वरील कार्यालयात उपलब्ध आहेत.

सही/-
कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था
रायगड अलिबाग

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की विद्यमान जमिन मालक १. स्मिता शशिकांत आवटी, २. अमृता राहुल कुलकर्णी यांचे ताबेकब्जातील व वहीवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्श्यातील खालील परिशिष्ठामध्ये वर्णन केलेली जमिन आमचे अशिलानी त्यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहू जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे

मौजे मोठे वेणगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन

भूमापन क्र.	उपविभाग क्र	क्षेत्र हे आर पॉ	आकारणी रु.पै.
७६	३/ब	०.३०.००	५.३०

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने, कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे पोस्टाने पाठवाव्यात अथवा त्यांस संपर्क साधावा.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमिन निर्वेध व बोजारहीत आहे असे समजणेत येवून सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पूर्ण केला जाईल. व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दिनांक: २७/१०/२०२६
ॲड. शंकेश राजेश ठाकरे
बी.एल.एस.एल.एल.बी,
पत्ता- गौरकामत, ता. कर्जत, जि. रायगड
मो. नं. ९२८४८९२३८७

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीस द्वारे कळविण्यात येते की, मौजे आक्षी, ता, अलिबाग, जि. रायगड खालील नमुद वर्णनाची बागायत जमिन मिळकत १. सौ. अपर्णा सुर्यकांत जोगळेकर, २. श्री. अभिजीत सुर्यकांत जोगळेकर, ३. सौ. राजश्री किरण सरपोतदार, सर्वजण रा. मु. शिंत्रे गल्ली, पो. आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या सामाईक मालकीची असून सदरील बागायत जमिन मिळकत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.चौ.मी)	आकार (रु.पै.)
आक्षी, ता. अलिबाग	५१६/२	बागायत ०-७८-०० पो.ख. ०-०२-०० एकूण क्षेत्र ०-८०-००	१६.०५

वर नमूद मिळकतीमधील १. सौ. अपर्णा सूर्यकांत जोगळेकर, २. श्री. अभिजीत सूर्यकांत जोगळेकर, ३. सौ. राजश्री किरण सरपोतदार यांच्या सामाईक मालकीचे क्षेत्र ०-०५-७० हे.आर, पो.ख. ०-०२-०० हे. आर. एकूण क्षेत्र ०-०७-७० हे. आर. आकार १.१७ रू. पै. या जमीन मिळकतीमधी प्लॉट नं. ९ ही बागायत मिळकत या नोटीसचा विषय आहे.

वर नमुद मिळकतीबाबत अन्य कुणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाणखत, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज, मृत्यूपत्र वगैरे बाबत हरकत असल्यास अशा व्यक्तींनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून पंधरा (१५) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक २६/१०/२०२६
सही/-
ॲड. प्रविण कृष्णा झेंडेकर
मु. शिंत्रे गल्ली, पो. आक्षी,
ता. अलिबाग, जि. रायगड
खरेदीदाराचे वकील
मोबा. नं. ९०११३६२८६७

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग
यांचे कार्यालय
काँग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

जा. क्र. जिउनि/गृह/मोफा क्र. ११/मा. अभि./जाहीर नोटीस २०३१/सन २०२६ दिनांक :- २३/१०/२०२६

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत)
जाहीर नोटीस

साई अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या, श्रीबाग क्षेत्र विकास योजना क्र.२, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी मे. साई बिल्डर अॅन्ड डेव्हलपर्स तर्फे पार्टनर, १. श्री. सुंदर गुलाबराय अडवाणी, रा. १० उपासना, प्लॉट नं. २२,११ रोड, खार. मुंबई - ५२२. श्री. शरद दत्तात्रेय चिटणीस. रा. एम ४२. श्रीबाग योजना नं. २, अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड.३. मुख्याधिकारी अलिबाग नगरपरिषद, अलिबाग, जि. रायगड यांचे विरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिका (मोफा) अधिनियमाचे कलम ११(३) अन्वये खालील मालमतेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करून मिळणे बाबत अर्ज केला आहे.

मालमत्तेचे वर्णन
रायगड जिल्ह्यातील ता.अलिबाग, अलिबाग येथील श्रीबाग क्षेत्र विकास योजना क्र. २ नं. २५, २६. १०० व १०१ पैकी भूखंड क्र. एम १. क्षेत्र ३६४ चौ.मी.

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतिम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकतीबाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावित कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक ०५/११/२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता उपस्थित राहून मांडावे तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक- २३/१०/२०२६
सही/-
(त.सं.पाटील)
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, रायगड अलिबाग

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे सालवड, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्रीम. भिमाबाई तातु खरीवले यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे.

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्रफळ (हे. आर)	आकार (रू.पै.)
७१	१	०-५७-००	५=३४

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अॅटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक २६/१०/२०२६
ॲड. महेश मोतीराम घारे
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४, ९२७१८६९२०२

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, मौजे लाडीवली ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिल यांनी त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्या कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

मालकाचे नांव	सर्व्हे नं.	प्लॉट नं.	क्षेत्र	आकार रू. पै.
अर्जुन खंडू तुपे	१/२/ब	५	३.७७.००	७.५४

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील बिनशेती मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

ठिकाण :- कर्जत
दिनांक :- २७/१०/२०२६
ॲड. शिल्पी प्रशांत परदेशी
बी. कॉम. एल. एल. बी
पत्ता- रत्नदुर्ग अपार्टमेंट, शिवाजी महाराज चौक जवळ पाटील आळी कर्जत
ता. कर्जत जि. रायगड पिन - ४१०२०१
मो. ९५०३१५२५२४

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने असे कळविण्यांत येते की, मौजे वावे, ता. मुरुड, जिल्हा रायगड येथील खालीलप्रमाणे हक्क नोटीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी संबंधित कब्जेदार रजिया सईद संबुलखानी यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे.

गट क्र.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु. पै.	वर्णन	गांव
१९३	एकुण क्षेत्र ६-४३-०९	४३-०९	भात	वावे, ता. मुरुड

वरील वर्णनाच्या जमीन मिळकतीपैकी संबंधित कब्जेदार व विक्रेता रजिया सईद संबुलखानी यांच्या मालकी हक्काचे क्षेत्र १-०८-५७ हे. आर. पॉ. आकार रु. ७.५०, या क्षेत्रापैकी ३० (तीस) गुंठे क्षेत्राची जमीन मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

सबब सदर वरील वर्णनाची संपूर्ण क्षेत्राच्या जमिन त्यामधील तदंगभूत वस्तु मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बोजा, बक्षीस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील ट्रस्ट, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत खालील सही करणारे ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहित रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही, कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, बोजाविरहित व खरेदी घेण्यास योग्य आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत, असे समजण्यात येईल हे सर्व लोकांस कळावे.

ठिकाण : नांदगाव, मुरुड-जंजिरा
दिनांक : २७/१०/२०२६
सही/-
अलिया मेहबूब सिर्सीकर
ॲडव्होकेट
रा. मु. पो. नांदगाव (सिर्सीकर कॉम्प्लेक्स),
ता. मुरुड,
जि. रायगड ४०२४०१.

दि. ०६/१०/२०२६

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली सदनिका विद्यमान मालक श्री. ज्योती गजानन लोंढे व गजानन मल्हार लोंढे यांच्या मालकीची सदनिका त्यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे. सदरची सदनिका ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर सदनिकेच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या सदनिकेचे वर्णन खालीलप्रमाणे.

सदनिकेचे वर्णन
मौजे गोंधळपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील भुमापन क्रमांक व उपविभाग ९५/१/१, क्षेत्र ०-६०-०० हे. आर. या बिनशेती मिळकतीवर बांधण्यात आलेल्या ''बे वूड्स २'' या प्रोजेक्टमधील इमारत क्र. ४ टाईप ए मधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. २०२ क्षेत्र ७१५ चौ.फुट (बिल्टअप) ज्याचा ग्रामपंचायत वेश्वी मालमत्ता क्र. ८९७-४/२०२ ही निवासी सदनिका या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरिल निवासी सदनिकेच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील निवासी सदनिकेच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची निवासी सदनिका निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरच्या निवासी सदनिकेचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

ॲड. मानस सुधाकर पाटील
मु. आंबेघर, पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा. नं. ७७४३८०९६५३

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली मौजे पेण ग्रामीण, ता. पेण, जि.रायगड येथील सामाईक मालकीच्या बिनशेती मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील बिनशेती मिळकत ही रजि. खरेदीखताने खरेदी करण्याबाबत आमचे अशिल श्री. अनिरूध्द यादव, रा. देवनगरी, पेण, ता.पेण, जि.रायगड यांच्यासोबत सदरहू शेत जमीन मिळकतीचा खरेदी व्यवहार ठरविण्यात आलेला आहे. सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यास सदरहू सामाईक बिनशेती मिळकतीचे विद्यमान मालक यांनी अनुमती दिलेली आहे. सदरच्या सामाईक बिनशेती मिळकतीचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे असलेले वर्णन खालीलप्रमाणे-

बिनशेती मिळकतीचे वर्णन -

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (आर.चौ.मी.)	आकारणी (रु. पै.)
पेण ग्रामीण	१३६/२	४.००.००	२५६.००

वरील सामाईक मालकी असलेल्या बिनशेती मिळकतीचे संपूर्ण क्षेत्र म्हणजेच ४.००.०० आर.चौ.मी. क्षेत्र (४.०० गुंठे) या जाहीर नोटीसचा विषय आहे.

वरील वर्णनाच्या सामाईक मालकीच्या बिनशेती मिळकतीचे जमीन मालक यांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील संपूर्ण क्षेत्र म्हणजेच ४.००.०० आर.चौ.मी. क्षेत्र हे पूर्णत: निर्वेध, बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरच्या बिनशेती मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही सदरहू सामाईक मालकीच्या बिनशेती मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह अगर लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकत न आल्यास सदरहू सामाईक मालकीच्या बिनशेती मिळकतीमधील विद्यमान जमीन मालक यांचा असणारा मालकी हक्क हा निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येऊन आमचे अशिल हे विद्यमान मालकांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील वरील सामाईक मालकी असलेल्या बिनशेती मिळकतीच्या खरेदी व्यवहाराबाबत सुरू असलेली बोलणी पूर्ण करून सदरहू बिनशेती मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तसेच वरील मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण-रायगड
दिनांक २७/१०/२०२६
अशिलांचे वकील
ॲड. श्री. जयंत घ. वैरागी
ऑफिस :- ''वैरागी व्हिला'',
पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण,
चिंचपाडा रोड, पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८८१६७१४२४

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे अलिबाग, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील अलिबाग नगरपरिषद हद्दीतील श्रीबाग क्षेत्रविकास योजना नं. २ मधील प्लॉट नं. एम-३७ वर बांधण्यात आलेल्या 'श्री अपार्टमेंट' इमारतीमधील तळमजल्यावरील वाणिज्य दुकानगाळा नं.१, बिल्टअप क्षेत्रफळ १३८ चौरस फुट, अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्रमांक ALB000002706, सदनिका क्रमांक ०१, (जुना नं. Z1ASB2002728, जुना घर नं. १२९/श्रीबाग २) ही वाणिज्य दुकानगाळा मिळकत त्या मिळकतीचे मालक कै. हरेश्वर गंगाधर कदम तर्फे वारस मनिषा हरेश्वर कदम व शर्मिला संतोष पेडणेकर यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

सदरहू वर्णन केलेली वाणिज्य दुकानगाळा मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याची व ती मिळकत आमचे अशिलांस कायमस्वरूपी विकण्याचा पुर्ण हक्क व अधिकार असल्याची हमी सदर मिळकतीचे मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापि सदर मिळकतींत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम. ओ. यु. करार, ताबे कब्जा वहीवाटी, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार रजिस्टर्ड खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २६/१०/२०२६
सही / -
ॲड. अनिकेत एच.गुरव
पत्ता : श्रीबाग नं.२, अलिबाग, जि. रायगड
ऑफीस : डॉ. केळकर क्लिनीक शेजारी,
शिवाजी चौक, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबाईल नं. : ९८५०४०२०५०

जाहीर नोटीस

वृंदावन गार्डन कॉम्प्लेक्स, डेफोडील EFG विंग सह. गृह. संस्था मर्या., मुद्रे, कर्जत (रायगड) येथील फ्लॅट क्र. ई-२०३ चे मूळ मालक नितीन बाबाराव कुंभारे यांचे शेअर सर्टिफिकेट क्र. ११ (शेअर अनुक्रमांक १०१ ते ११०) गहाळ झाले आहे (मानपाडा पो. ठाणे तक्रार क्र. ६९२/२०२६).

सदर फ्लॅटचे खरेदीदार गुलाम हुसेन अब्दुल मूत्तालिब मुल्ला यांनी दुय्यम शेअर प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे. या हस्तांतरावर कोणाचा आक्षेप, गहाण, दावा किंवा हक्क असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत खालील पत्त्यावर लेखी पुराव्यासह संपर्क साधावा, अन्यथा संस्था पुढील कायदेशीर कार्यवाही करेल.

दिनांक : २७/१०/२०२६
पत्ता/संपर्क: मुद्रे, ता. कर्जत,
जि. रायगड. मो. ९७६५४८१७७७
- मानद सचिव

जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालक १) नरेश संतोष जाधव, २) सतिष संतोष जाधव दोघे रा. सावेळे ता.कर्जत,जि.रायगड यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे.

जमिन मिळकतीचे वर्णन
मौजे सावेळे, ता. कर्जत, जि. रायगड.

स.नं./हि.नं.	क्षेत्र हे. आर. पॉ.	आकार (रू.पै.)
९/४	एकुण क्षेत्र ०-३९-७० यापैकी विकत दिलेले अविभक्त हिश्श्याचे क्षेत्र ०-१९-८५	२-५०

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, विक्री करार, खरेदी मेन्टेनन्स, मेहेर, वारसाहक्क, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क, बँक लोन, वगैरेबाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत वा तक्रार असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली तक्रार अगर हरकत खाली सही करणार यांच्याकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत तक्रार वा हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही हे सर्वांस कळावे.

ठिकाण : कर्जत
दिनांक : २७/१०/२०२६
सही/-
ॲड. गणपत का.फुलावरे ॲड. गीतांजली जी. फुलावरे
कार्यालय पत्ता : ''मधुतारा बिल्डींग'' गाळा नं. ३
कचेरी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ८८८८०४५३७६/७७७५९९३०८८

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांना मौजे आवास, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेली मिळकत, त्यामधील बांधकामांसह विद्यमान मालक मेसर्स दार्मिला फॅशन प्रा. लि. तर्फे संचालक उर्मिला तल्यारखान यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे. विद्यमान मालकांनी मिळकतीवरील त्यांचा मालकीहक्क निर्वेध असल्याचा भरवसा दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे आवास, ता. अलिबाग, जि. रायगड येथील

भुमापन व उपविभाग क्र.	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रू. पैसे
२९३/१	००-७१-०० त्यामधील बिनशेती ००-४०-०० क्षेत्रासह	७.२५

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल मिळकत खरेदी घेण्याचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : २६/१०/२०२६
ॲड. रविंद्र विनायक ओक
''गुरुकृपा'' महर्षी कर्वे रोड,
ता. अलिबाग, जि. रायगड

जाहीर नोटीस

मी, हरकतदार श्री. नितेश लक्ष्मण केळकर रा.मु.पो.झिराड, ता.अलिबाग, जि. रायगड या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळवू इच्छिते की, मौजे झिराड, ता.अलिबाग, जि. रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालील.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नंबर	क्षेत्र (हे. आर.)	आकार (रू.पै.)
झिराड, ता. अलिबाग, जि.रायगड.	१८६	क्षेत्र ०-२९-६० पो.ख. ०-०३-३० एकूण ०-३२-९०	६.४५

सदरहू वर वर्णन केलेल्या मिळकतीसंदर्भात व इतर मिळकतीसंदर्भात अलिबाग येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांच्या कोर्टात श्री. नितेश लक्ष्मण केळकर व इतर यांनी रेग्यलर मुकदमा नं.८७/२०२२ ने दावा दाखल होता. सदरहू दावा दाखल करताना काही वडिलोपार्जित मिळकती दाव्यामध्ये समाविष्ठ करण्याच्या राहून गेल्या व काही नावांमध्ये त्रुटी होत्या. त्यामुळे वादी यांनी नव्याने दावा दाखल करणेसाठी दि.१७/०४/२०२६ रोजी निशाणी क्र.५२ ने दावा मागे घेतला. सदरहू वर वर्णन वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी श्री. नितेश लक्ष्मण केळकर व इतर हे नव्याने अलिबाग येथील दिवाणी न्यायालयात दावा दाखल करणार आहेत.

तरी या नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे झिराड, ता.अलिबाग, जि.रायगड येथील गट नं.१८६ या मिळकतीसंबंधी कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्रीचा अथवा अन्य हस्तांतरणाचा व्यवहार करु नये. याउपर कोणीही गट नं.१८६ या मिळकतीच्या हस्तांतरणाचा व्यवहार केल्यास त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंदी घ्यावी.

अलिबाग.
दि.२४/१०/२०२६.
सही/-
श्री. नितेश लक्ष्मण केळकर
रा.झिराड, ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९०२२८५८३२५.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक ऋषिकेश अरुण गायकवाड व इतर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

मौजे ढाक तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार रु पैसे
५९/२	एकुण क्षेत्र ५-८९-३० हे आर पॉ या एकुण क्षेत्रापैकी वरील मालक यांचे एकुण क्षेत्र १-३४-८० हे आर पॉ यापैकी क्षेत्र ०-८६-०० हे आर पॉ	२-००

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २६/१०/२०२६
खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हु मोरे
मोबा. ९८२२६९११०९
पत्ता - दहिवली तर्फे नीड तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक प्रसाद हिराचंद पिंगळे यांचे कडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्र. व उपविभाग	क्षेत्र (आर.चौ.मी)	आकार (रू. पै)
वरसोली, ता. अलिबाग	१८/२	२-८०-००	२८.००

वर वर्णन केलेली जमिन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक - २४/१०/२०२६
ॲड. विराज शरद अंबुकर
मु. हनुमानवाडी, थेरोंडा, पो. चौल,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. क्र. ९०२८८५१२८०

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) अभिजित शशिकांत मोहिते एच यु एफ २) रणजित हिम्मतमल जैन ३) रमणिकलाल करमसी पटेल ४) श्रीकांत जुगराज ओसवाल ५) मोहनलाल भैरूमलजी लुणीया ६) ज्योती प्रविण घरत यांचे कडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्र. व उपविभाग	क्षेत्र (आर.चौ.मी)	आकार (रू. पै)
नागांव, ता. अलिबाग	२१८७/१/७	३-२१-००	३२.१०


वर वर्णन केलेली जमिन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक - २६/१०/२०२६
ॲड. राहूल रमेश नाईक
मु. पो. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

निवडक

रायगडच्या कौस्तुभ म्हात्रेची महाराष्ट्र संघात निवड

रायगड : रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन व पेण स्पोर्ट्स असोसिएशन संघाचा गुणवान युवा क्रिकेटपट्टू कौस्तुभ हेमंत म्हात्रे याची काल महाराष्ट्राच्या तेवीस वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट संघात निवड करण्यात आली आहे.



कौस्तुभ हा जलदगती गोलंदाज असून रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या संघासाठी खेळतांना त्यांनी उत्तम खेळाचे प्रदर्शन एमसीए इन्व्हिटेशन लीग स्पर्धेमध्ये केलं होते. परिणामी त्यांनी केलेल्या चांगल्या दर्जाच्या खेळाच्या जोरावर त्याची निवड महाराष्ट्राच्या तेवीस वर्षाखालील मुलांच्या संघात करण्यात आली आहे. पेण तालुक्यातील निगडी गावातील सर्व सामान्य कुटुंबाचा ह्या गुणवान खेळाडूची निवड महाराष्ट्राच्या संघात झाल्याने संपूर्ण पेण तालुक्या सह रायगड जिल्ह्यातील क्रिकेट खेळाडू व क्रिकेट प्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील सचिव प्रदिप नाईक,पेण स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष अरुण शिंदे यांच्या सह जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी कौस्तुभ म्हात्रे यांचे अभिनंदन केले आहे. रोशनी पारधी नंतर कौस्तुभ म्हात्रे अशा पुरुष व महिला खेळाडूंची निवड स्टेट व नॅशनल लेव्हल क्रिकेट स्पर्धेसाठी झाली असल्याने रायगड जिल्ह्यातील युवा पुरुष व महिला क्रिकेट खेळाडूंना यातून प्रेरणा मिळणार आहे.भविष्यात चांगल्या दर्जाचे क्रिकेटपट्टू तयार करणार असल्याचे मत अनिरुद्ध पाटील यांनी व्यक्त केले आहे.

करण सिंहची चमकदार कामगिरी

मुंबई : भारताचा करण सिंहने आयटीएफ सर्किटवरील आपला दबदबा कायम राखला. त्याने रविवारी कूपरेज स्थित महाराष्ट्र स्टेट लॉन टेनिस असोसिएशयन आयोजित ३०,००० अमेरिकन डॉलर रोख पारितोषिक असलेल्या आयटीएफ मेन्स वर्ल्ड टेनिस टूर एम-३५ स्पर्धेत त्याने सिंगल्सचे जेतेपद आपल्या नावे केले.तिसरे मानांकन प्राप्त करणने फायनलमध्ये आपल्या अकादमीतील सहकारी खेळाडू दिग्विजय प्रताप सिंहचा पराभव केला.



दुसऱ्या सेटमध्ये जेव्हा करण ७-५, ३-१ असा आघाडीवर होता, तेव्हा दिग्विजय दुखापतीमुळे सामन्यातून बाहेर झाला. हा २०२६ हंगामातील करणचे चौथे जेतेपद ठरले. हा २३ वर्षीय खेळाडू मागील काही महिन्यांपासून चांगल्या फॉर्मात आहे. मुंबईत मिळालेला विजय हा त्याचा मागील दोन महिन्यातील दुसरा विजय ठरला. तो या काळात चौथ्यांदा फायनलमध्ये पोहचला. आउटडोर हार्ड कोर्टवर खेळवण्यात आलेल्या या सामन्यात दोन्ही खेळाडूंधील पहिला सेट खूपच अटीतटीचा राहिला. एक तासांपेक्षा जास्त काळ चाललेल्या या सेटमध्ये अखेरीस करणने बी मारत तो ७-५ अशा आपल्या नावे केला. तिच लय कायम राखताना करणने दुसऱ्या सेटमध्ये ३-१ अशी आघाडी मिळवली. तेव्हा दुर्दैवाने १ तास ३२ मिनिटांच्या खेळानंतर दिग्विजय दुखापतीमुळे सामन्यातून बाहेर पडला, ज्यामुळे करणला अधिकृतरित्या चॅम्पियनशीप ट्रॉफी मिळाली.

बुद्धिबळ स्पर्धेत रिहान, अर्हा विजेते

मुंबई : आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी आणि आनंदराव अडसूळ चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने, लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एलआयसी) सहपुरस्कृत एलआयसी-मुंबई महापौर चषक शालेय बुद्धिबळ स्पर्धेत ९ वर्षांखालील गटात आंतरराष्ट्रीय फिडे गुणांकित रिहान कुळकर्णी, तर १३ वर्षांखालील गटात अर्हा वाघमारे यांनी गटविजेतेपद पटकावले. परेल येथील आरएमएमएस वातानुकूलित सभागृहात झालेल्या स्पर्धेच्या निर्णायक पाचव्या फेरीत नऊ वर्षांखालील गटातील पहिल्या पटावर रिहान कुळकर्णी आणि अपराजित सोहिला कौर यांच्यात विजेतेपदासाठी चुरशीची लढत झाली. आक्रमक चालींच्या जोरावर रिहानने २५व्या चालीत सोहिलाच्या राजाला शह देत विजय मिळवला आणि गटविजेतेपदावर नाव कोरले. विजेत्या रिहानला नगरसेवक रोहिदास लोखंडे यांच्या हस्ते आकर्षक चषक आणि भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. १३ वर्षांखालील गटात अर्हा वाघमारेने स्विस साखळी पद्धतीने झालेल्या स्पर्धेतील पाचही सामने जिंकत पाच गुणांसह निर्विवाद वर्चस्व गाजवले. फिडे गुणांकित मयुरेश पाटीलने साडेतीन गुणांसह द्वितीय, अर्णव जगतापने साडेतीन गुणांसह तृतीय, प्रणव जैनने तीन गुणांसह चौथा, तर दीप फुणगेने तीन गुणांसह पाचवा क्रमांक मिळवला. नऊ वर्षांखालील गटात रिहान कुळकर्णीने पाच गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. अंश शर्माने चार गुणांसह द्वितीय, सोहिला कौरने चार गुणांसह तृतीय, रिहान दुबेने चार गुणांसह चौथा, तर ओनीर वर्तकने साडेतीन गुणांसह पाचवा क्रमांक मिळवला.

सिंधू फ्रेंच ओपनमध्ये पराभूत

मुंबई : भारताच्या पी. व्ही. सिंधूला फ्रेंच ओपन बॅडमिंटनच्या अंतिम सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. रविवारी झालेल्या सामन्यात तिला जागतिक क्रमवारीतील अव्वल स्थानावरील दक्षिण कोरियाच्या एन से-यंगने १६-२१, २१-११, २१-१२ असे पराभूत केले. या विजयासह यंगने सलग तिसऱ्यांदा फ्रेंच ओपनचे विजेतेपद पटकावले.सिंधूने पहिला गेम जिंकून चांगली सुरुवात केली, मात्र पुढील दोन्ही गेम गमावले. एनविरुद्धचा हा तिचा सलग ११वा पराभव आहे.निर्णायक गेममध्ये सिंधूसाठी पुनरागमन करणे कठीण ठरले. एनने दुसऱ्या गेममध्ये २१-११ आणि तिसऱ्या गेममध्ये २१-१२ असा विजय मिळवला. अशा प्रकारे भारतीय खेळाडूला अंतिम सामन्यात पराभव पत्करावा लागला.सिंधूने उपांत्य फेरीत जपानच्या हिना अकेचीचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला होता. २०२६ मध्ये त्यांची ही दुसरी सुपर ७५० अंतिम फेरी होती. जुलैमध्ये त्यांनी जपान ओपनचे विजेतेपद पटकावले होते. सिंधूने आक्रमक फटक्यांचा आणि आपल्या लांब पल्ल्याच्या पोहोचेचा चांगला वापर केला. त्यांनी २० मिनिटांत पहिला गेम २१-१६ असा जिंकून आघाडी घेतली.बाजू बदलल्यानंतर यंगने दुसऱ्या गेममध्ये वेगवान सुरुवात करत सिंधूवर दबाव आणला. भारतीय खेळाडूच्या चुकांचा फायदा घेत तिने गेम जिंकला आणि सामना १-१ असा बरोबरीत आणला.निर्णायक गेममध्ये सिंधूने ८-५ अशी आघाडी घेतली, मात्र यंगने पुनरागमन करत गुणसंख्या बरोबरीत आणली. त्यानंतर कोरियन खेळाडूने सतत दबाव कायम ठेवला आणि गेम जिंकून विजेतेपद आपल्या नावावर केले.

अलिबागच्या तिरंदाजांचा अचूक वेध



- रायगड जिल्हास्तरीय आर्चरी स्पर्धा
- विभागीय स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड

। रायगड । प्रतिनिधी ।

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने नेहुली येथील जिल्हा क्रीडा संकुलात शनिवारी (दि. २४) आयोजित शालेय जिल्हास्तरीय आर्चरी (धनुर्विद्या) स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील तिरंदाजांनी पदकाला गवसणी घालत अचूक वेध घेतला. रायगडच्या खेळाडूंनी १५ सुवर्ण, १३ रौप्य, ५ कांस्य पदकांची कमाई केली.

या स्पर्धेत बावलेकर आर्चरी अकॅडमीच्या अलिबाग येथील पाच तिरंदाजांनी स्पर्धेवर आपले वर्चस्व ठेवले. कंपाऊंड प्रकारात३ सुवर्ण आणि २ रौप्य पदकांचा अचूक निशाणा या तिरंदाजांनी साधला. हि स्पर्धा १४ वर्षाखालील, १७ वर्षाखालील आणि १९ वर्षाखालील मुले आणि मुलींमध्ये झाली. या स्पर्धेसाठी इंडियन , कंपाऊंड आणि रिकव्ह असे तीन प्रकारचे धनुष्य वापरण्यात आले होते.

या स्पर्धेत इंडियन प्रकारात १४ वर्षाखालील मुलींच्या गटात त्रिशा घोलप सुवर्ण, श्रिया टेंबे रौप्य , शुभ्रा गुरव कांस्य तर असामी जगताप हिने विशेष प्राविण्य मिळविले. १४ वर्षाखालील मुलांच्या गटात अमित गडखल सुवर्ण, कार्तिक जोशी रौप्य, लक्षराज जंगम कांस्य तर शंभूराजे देशमुख याने विशेष प्राविण्य मिळविले. १७ वर्षाखालील मुलांच्या गटात अर्णव शेडगे सुवर्ण, सुमित आंधळे रौप्य, सुखप्रीत सिंह कांस्य तर पांडुरंग हंबीर याने विशेष प्राविण्य मिळविले. १७वर्षाखालील मुलींच्या गटात निधी चौधरी सुवर्ण, सोनल चव्हाण रौप्य, ममता वाघमारे कांस्य तर रितिका महाडिक हिने विशेष प्राविण्य मिळविले. १९ वर्षाखालील मुलांच्या गटात जुनेद अन्सारी सुवर्ण, मोहम्मद अहमद याने रौप्य पदक पटकावले. मुलींच्या गटात जयश्री वाघमारे हिने सुवर्णपदक पटकावले.

रिकव्ह प्रकारात १४ वर्षाखालील मुलांच्या गटात सार्थक महामुणकर याने सुवर्ण पदक पटकावले.१७ वर्षाखालील मुलांच्या गटात मकरंद मच्छिन्द्रनाथ सुवर्ण तर रुद्र निंबरे याने रौप्य पदक पटकावले, १७ वर्षाखालील मुलींच्या गटात श्वेता विश्वनाथ हिने सुवर्णपदक पटकावले. १९ वर्षाखालील मुलांच्या गटात जय पाटील सुवर्ण तर पारस पवार याने रौप्य पदक पटकावले.

कंपाऊंड प्रकारात १४ वर्षाखालील मुलींच्या गटात पीएनपी होली चाइल्ड शाळेची विद्यार्थिनी ओवी पाटील हिने सुवर्णपदक पटकावले, तर चिमणराव केळकर विद्यालयाची विद्यार्थिनी स्वहा कदम हिने रौप्यपदक मिळवले. १४ वर्षाखालील मुलांच्या गटात कल्पक उतेकर सुवर्ण तर देवस्य वालिया याने रौप्य पदकावर निशाणा साधला.

१७ वर्षांखालील मुलांच्या गटात सेंट मेरी हायस्कूलचा विद्यार्थी आशय आंग्रे याने सुवर्णपदकावर नाव कोरले. तर सार्थक बेटकर याने रौप्य पदक पटकावले. तसेच, १७ वर्षांखालील मुलींच्या गटात सेंट मेरी हायस्कूलची विद्यार्थिनी तनिषा वर्तक हिने सुवर्णपदक, तर सई पिळणकर हिने रौप्यपदक पटकावले. १९ वर्षाखालील मुलांच्या गटात मयूर बांगारा सुवर्ण, आर्यन कोटकर रौप्य तर विराज माने याने कांस्य पदक पटकावले. मुलींच्या गटात इशा पवार हिने सुवर्ण पदकाचा वेध घेतला.

परीक्षक म्हणून जिल्हा क्रीडा संकुल अलिबागचे क्रीडा अधिकारी देविदास पाटील, बावलेकर आर्चरी अकॅडमीचे प्रशिक्षक संतोष जाधव, लाभेश तेली, आयुष्य खोत, यांनी काम पाहिले. या सर्व खेळाडूंची ३१ ऑक्टोबर आणि १ नोव्हेंबर रोजी मुंबई येथे होणाऱ्या विभागीय आर्चरी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

हरमनप्रीत कौर व दीप्ती शर्माचे वादळी शतक

भारताने मालिकेत घेतली आघाडी



- वैष्णवी शर्माची उत्कृष्ट गोलंदाजी

। वडोदरा । वृत्तसंस्था ।

वडोदराच्या बीसीए स्टेडियममध्ये पार पडलेल्या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात भारतीय महिला संघाने झिम्बॉब्वेचा १२१ धावांनी पराभव करत सामन्यासह मालिकाही आपल्या खिशात घातली. हरमनप्रीत कौर व दीप्ती शर्माच्या वादळी शतकी खेळीच्या जोरावर प्रथम फलंदाजी करताना भारताने झिम्बॉब्वेसमोर ६ बाद ३२९ धावांचे आव्हान दिले होते. दुसऱ्या डावात वैष्णवी शर्माने ४ विकेट घेत झिम्बॉब्वेची मधली फळी उद्धवस्त केली. अशाप्रकारे झिम्बॉब्वेला सर्वबाद २०७ धावांचा पल्ला गाठता आला.

दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात, कर्णधार स्मृती मंधानाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मंधाना आणि प्रतिका रावलने डावाची सुरुवात केली. पहिल्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर भारताला मोठा धक्का बसला. संघाची धावसंख्या १ असताना स्मृती शून्यावर बाद झाली. १९ धावांवर भारताने दुसरी विकेट गमावली. शफाली वर्मा ८ चेंडूंत ८ धावा करून बाद झाली. हरमनप्रीत कौर आणि प्रतिका रावल यांनी आपली भागीदारी कायम ठेवत भारताला १०० धावांच्या पुढे नेले.

प्रतिकाच्या रुपात भारताला तिसरा धक्का बसला. प्रतिका ६७ चेंडूवर ६१ धावा करुन तंबूत परतली. न्याशा ग्वांनजुराने तिला बाद केले. त्यानंतर, तेजल हसनबीस स्वस्तात बाद झाली. यानंतर, हरमनप्रीत आणि दीप्ती शर्माने भारताचा डाव पुढे नेला. हरमनप्रीतने शानदार फलंदाजी करत शतक ठोकले. तिने १२१ चेंडूमध्ये १२६ धावा केल्या. कर्णधारपद सोडल्यानंतर हरमनप्रीत कौरने आपले पहिले शतक झळकावले आहे. हरमनप्रीतच्या विकेटनंतर, दिप्तीने आक्रम खेळी सुरुच ठेवली. दिप्तीने देखील ८६ चेंडूमध्ये झंझावाती शतक ठोकले. ८६ चेंडूमध्ये १०६ धावा करत ती नाबाद राहिली. हरमनप्रीत आणि दिप्तीच्या उत्कृष्ट खेळीने भारताला मोठ्या धावसंख्येपर्यंत पोहोचवले.

मॅरेथॉन स्पर्धेत बोरीच्या अवणी म्हात्रेची भरारी

। खरोशी । प्रतिनिधी ।

बोरी गावाची अवणी म्हात्रे हिने आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर अलिबाग येथे झालेल्या ५ कि.मी.मॅरेथॉन स्पर्धेत गटात प्रथम क्रमांक पटकावला आहे.



अलिबाग येथे आयोजित करण्यात आलेल्या या मॅरेथॉन स्पर्धेत विविध वयोगटांतील धावपटूंनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत अवणी म्हात्रे हिने जिद्द, चिकाटी, शारीरिक क्षमता आणि धावण्यातील कौशल्याच्या जोरावर आपले वर्चस्व सिद्ध केले. ५ किमीचे अंतर यशस्वीरीत्या पूर्ण करत तिने आपल्या गटात प्रथम क्रमांक मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली. अवणी ही किरण बळीराम म्हात्रे यांची कन्या असून, कबड्डी क्षेत्रातील शिवछत्रपती पुरस्कार विजेते आणि नामांकित खेळाडू प्रमोद म्हात्रे यांची पुतणी आहे. क्रीडा क्षेत्राची परंपरा लाभलेल्या कुटुंबातील अवणीने मिळविलेले हे यश विशेष कौतुकास्पद मानले जात आहे.आजच्या काळात विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही आपले कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे. धावण्यासारख्या खेळातून शिस्त, सातत्य, आत्मविश्वास आणि मेहनतीची सवय लागते. आवणीच्या यशामुळे परिसरातील अन्य मुला-मुलींनाही क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्याची प्रेरणा मिळणार आहे.

अवणीने मिळविलेल्या या यशाबद्दल तिचे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार आणि बोरी ग्रामस्थांकडून अभिनंदन केले जात आहे. भविष्यातही तिने अशाच प्रकारे उत्कृष्ट कामगिरी करून मोठ्या स्तरावरील स्पर्धांमध्ये यश संपादन करावे आणि आपल्या गावाचे, तालुक्याचे व जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा व्यक्त होत आहेत.

शालेय टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन

पनवेल : क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा किडा कार्यालय अलिबाग व नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ याच्या संयुक्त विद्यमाने मुंबई विभागीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. १९ वर्षाखालील मुले व मुली अशा विविध गटात नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ, सिडको समाज मंदिर, दुसरा मजला नवीन पनवेल येथे महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते संजय सुदाम कडू यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली आहे.

मुंबई विभागीय धनुर्विद्या क्रीडा स्पर्धा

पीएनपीच्या ओवी पाटीलची निवड

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हास्तरीय शालेय धनुर्विद्या क्रीडा स्पर्धा २०२६-२७ मध्ये पीएनपी होली चाईल्ड स्कूल, वेश्वी-अलिबाग येथील विद्यार्थिनी ओवी प्रणय पाटील हिने उल्लेखनीय कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. या शानदार यशाच्या जोरावर तिची मुंबई विभागीय धनुर्विद्या क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अलिबाग-रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलींच्या गटात ओवीने आपल्या कौशल्याच्या जोरावर प्रथम क्रमांक मिळवत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. ओवीने मिळवलेल्या या यशाबद्दल पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, पीएनपी होली चाईल्ड स्कूलच्या एसएससी बोर्डच्या मुख्याध्यापिका निसर्गा चेवले, उपमुख्याध्यापिका शर्मिला शेटे, क्रीडा प्रशिक्षक अक्षय डाकी तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन केले. तसेच आगामी मुंबई विभागीय स्पर्धेसाठी क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. ओवीच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेसोबतच क्रीडा क्षेत्रातील प्रगतीही अधोरेखित झाली असून, तिच्या पुढील स्पर्धेतील कामगिरीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जिंदल विद्या मंदिरची पालक क्रिकेट लीग

। मुरुड । प्रतिनिधी ।

शाळा म्हणजे केवळ विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यापुरते मर्यादित नाते नसून पालकांचाही शाळेच्या वाटचालीतील महत्त्वाचा सहभाग असतो. हे नाते अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने जिंदल विद्या मंदिर, साळाव यांच्या वतीने मार्कोस क्रे यांच्या सहकार्याने पालक क्रिकेट लीग या विशेष क्रीडा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



या क्रिकेट लीगसाठी एकूण चार संघांची निर्मिती करण्यात आली होती. त्यापैकी तीन संघ पालकांचे, तर एक संघ जिंदल विद्या मंदिरच्या शिक्षकांचा होता. पालक आणि शिक्षकांनी मैदानावर उतरून क्रिकेटचा मनमुराद आनंद घेतला. सामन्यांदरम्यान खेळाडूंचा उत्साह, चौकार-षटकारांची आतषबाजी, सहकाऱ्यांचे प्रोत्साहन आणि उपस्थितांचा जल्लोष यामुळे संपूर्ण वातावरण क्रीडामय झाले होते. सर्व सामने उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मार्कोस क्रेचे राज शेखर यांनी विशेष पुढाकार घेतला. मार्कोस क्रेचे क्रीडा प्रशिक्षक प्रताप आणि वृषाली यांनी सामन्यांच्या आयोजनात आणि क्रीडा मार्गदर्शनात महत्त्वपूर्ण सहकार्य केले. त्यांच्या नियोजनामुळे आणि सहकार्यामुळे पालक व शिक्षकांना खेळाचा आनंद घेण्याची उत्तम संधी मिळाली. या उपक्रमाबद्दल जेईटी प्रमुख डॉ. भावेश भालेराव यांनी पालकांच्या सहभागाचे कौतुक करत पालकांचा सक्रिय सहभाग ही आनंददायी बाब असल्याचे नमूद केले. पंकज मलिक यांनी खेळाच्या माध्यमातून शाळा आणि पालक यांच्यातील नाते अधिक दृढ करणाऱ्या उपक्रमाचे स्वागत केले.

दुखापतीने रोखली भारताच्या गोल्डन बॉयची भरारी!

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय वेटलिफ्टिंगमध्ये आपल्या कामगिरीने नवी आशा निर्माण करणारा जेरेमी लालरिनुंगा सध्या दुखापतींमुळे कारकिर्दीतील कठीण टप्प्यातून जात आहे.



२०२२ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून त्याने देशाचे नाव उज्ज्वल केले होते. मात्र, वारंवार झालेल्या दुखापतींमुळे त्याच्या कारकिर्दीच्या प्रगतीला मोठा अडथळा निर्माण झाला आहे.

राष्ट्रकुल स्पर्धेतील सुवर्णपदकानंतर जेरेमीची लोकप्रियता मोठ्या प्रमाणात वाढली. भविष्यात ऑलिम्पिकसारख्या प्रतिष्ठेच्या स्पर्धेतही तो भारतासाठीपदकजिंकेल, अशी अपेक्षा व्यक्त होऊ लागली. मात्र, गेल्या काही वर्षांतील दुखापतींनी त्याच्या कारकिर्दीसमोर मोठे आव्हान उभे केले आहे.यापूर्वीही अनेकदा दुखापतींवर मात करून जेरेमीने पुनरागमन केले आहे.

फिफा अंडर-१५ विश्वचषक २०२६ स्पर्धा | कॅमेरूनला २-१ ने हरवले

भारताचा डबल धमाका!

। मुंबई । प्रतिनिधी ।

फिफा अंडर-१५ विश्वचषक २०२६ स्पर्धेत भारतीय फुटबॉल संघाने आपली विजयी घोडदौड कायम ठेवली आहे. रविवारी झालेल्या गटातील दुसऱ्या सामन्यात भारताने कॅमेरूनचा २-१ असा पराभव करत सलग दुसऱ्या विजयाची नोंद केली. पावसामुळे मैदानावर आव्हानात्मक परिस्थिती असतानाही भारतीय खेळाडूंनी जिद्दीने खेळ करत विजयावर शिक्कामोर्तब केले. गोलरक्षक जेनित निंगथौजाम याने पेनल्टीसह अनेक महत्त्वाचे बचाव करत भारताच्या विजयात मोलाची भूमिका बजावली.



होवसन कॉम्पिटिशन कॉम्प्लेक्सवर झालेल्या या सामन्यात भारताला पहिल्याच मिनिटाला आघाडी मिळाली. दीपक सिंह आरामबम याच्या कॉर्नर किकवर कॅमेरूनच्या फरेल न्गोबोने चुकून आपल्याच गोलपोस्टमध्ये बॉल टाकण्यात आला, अशा विचित्र स्थितीत भारताने १-० अशी आघाडी घेतली.

यानंतर कॅमेरूनने आक्रमक खेळ करत भारतीय गोलक्षेत्रात दबाव निर्माण केला. मात्र, गोलरक्षक जेनितने अप्रतिम बचाव करत प्रतिस्पर्ध्यांचे प्रयत्न हाणून पाडले. १६व्या मिनिटाला फ्री-किक, तर १७व्या आणि १८व्या मिनिटाला मिळालेल्या संधींवर त्याने शानदार बचाव केला.भारतानेही आघाडी वाढवण्याचा प्रयत्न केला.

लालरेमरुआतफेलाचा निर्णायक गोल

दुसऱ्या सत्रात भारताने नव्या जोमाने खेळाला सुरुवात केली. रोनांदेव अहेइबाम याला मैदानात उतरवल्यानंतर भारतीय संघाच्या आक्रमणाला अधिक धार मिळाली. २७व्या मिनिटाला रोनांदेवने मिडफिल्डमध्ये चेंडूवर ताबा मिळवत तो दीपककडे सोपवला. दीपकने गोलक्षेत्रात अचूक लो क्रॉस दिला. त्यावर कर्णधार आर. लालरेमरुआतफेला याने डाव्या पायाने चेंडूला गोल पोस्टची दिशा दाखवली.

गोलरक्षक जेनितचा शानदार बचाव

३१व्या मिनिटाला कॅमेरूनला पेनल्टी मिळाल्याने भारताच्या विजयासमोर मोठे आव्हान उभे राहिले. नारा मेइतेई लौशंबम याच्याकडून हाताने चेंडू अडवला गेल्याने पंचांनी कॅमेरूनला पेनल्टी बहाल केली. मात्र, जेनित निंगथौजाम याने ३२व्या मिनिटाला हारौना अब्दौले याची पेनल्टी रोखून भारताची आघाडी कायम राखली सामन्याच्या अखेरच्या टप्प्यातही भारताने आक्रमण सुरूच ठेवले. रोनांदेवच्या जोरदार फटक्यानंतर गोलरक्षकाने सौमोजित सरकार याची फ्री-किकही अडवली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)